नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५२ * अंक १८२ * * अकोला * रविवार, दिनांक ४ जानेवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## थोडक्यात..

### बुध्दाचे अवशेष परतल्याने आपण धन्य : मोदी



■ **नवी दिल्ली :** पंतप्रधान मोदींनी भगवान बुद्धांशी संबंधित अवशेषांच्या भारतात परतण्यावर सांगितले की, हे अवशेष आपल्यामध्ये परत मिळाल्याने आपण धन्य झालो आहोत. १२५ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर भारताचा वारसा परतला आहे. अवशेषांचे भारतातून बाहेर जाणे आणि पुन्हा परत येणे हा एक मोठा धडा आहे. गुलामगिरीच्या काळात ते भारताकडून हिरावून घेण्यात आले होते.
जे लोक ते घेऊन गेले होते, त्यांच्यासाठी ते केवळ पुरातन वस्तू होत्या, त्यामुळे त्यांनी आंतरराष्ट्रीय बाजारात त्यांचा लिलाव करण्याचाही प्रयत्न केला. भारताने ठरवले की, आम्ही त्यांचा लिलाव होऊ देणार नाही. आम्ही गोदरेज समूहाचे आभार मानतो. त्यांच्या सहकार्यामुळे हे अवशेष बुद्धांच्या भूमीवर परत येऊ शकले.

### तिकीट मागणाऱ्या इच्छुकांनी संघापासून दूर राहावे



■ **भोपाळ :** भोपाळमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने 'प्रमुख जन गोष्ठी' आयोजित करण्यात आली. यावेळी सरसंघचालक डॉ. मोहन भागवत म्हणाले की, भाजप किंवा कोणत्याही राजकीय पक्षाकडे पाहून संघाला समजणे ही सर्वात मोठी चूक आहे. संघाचा उद्देश सत्ता, तिकीट किंवा निवडणुका नसून, समाजाची गुणवत्ता आणि चारित्र्य निर्माण करणे आहे. संघ ना तर राजकीय संघटना आहे, ना कोणती निमलष्करी किंवा सेवा संस्था, तर हे समाजाला आत्मनिर्भर आणि अनुशासित बनवण्याचे आंदोलन आहे.

### इंदूरचे विषारी पाणी तिघांवर गारपीट

■ **इंदूर :** इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे झालेल्या मृत्यूंच्या प्रकरणात मोहन सरकारने मनपा आयुक्त दिलीप यादव यांना हटवले आहे. तर, अतिरिक्त आयुक्त रोहित सिसोनिया आणि प्रभारी अधीक्षक अभियंता संजीव श्रीवास्तव यांना निलंबित करण्यात आले आहे. यापूर्वी आयुक्त दिलीप यादव आणि अतिरिक्त आयुक्त रोहित सिसोनिया यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. अतिरिक्त आयुक्त सिसोनिया यांची बदली करण्यात आली होती. तर, प्रभारी अधीक्षक अभियंता संजीव श्रीवास्तव यांच्याकडून जल वितरण कार्य विभागाचा प्रभार काढून घेण्यात आला होता.

# बिनविरोध अडचणीत!

## निवडणूक आयोगाकडून चौकशीचे आदेश : पालिका निवडणुकांवर संशय

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर/मुंबई, दि. ३ :**
महाराष्ट्रातील २९ महापालिका निवडणुकांसाठी अवघे १२ दिवस शिल्लक असताना राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. मतदान होण्याआधीच राज्यभरात ६९ उमेदवार नगरसेवकपदी बिनविरोध निवडून आल्याने मोठी चर्चा सुरू झाली आहे.
या बिनविरोध निवडी लोकशाही प्रक्रियेला बाधा पोहोचवणाऱ्या आहेत का, याचा तपास करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने दिले असून चौकशी पूर्ण होईपर्यंत कोणत्याही बिनविरोध विजयी उमेदवाराची अधिकृत घोषणा केली जाणार नसल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.
राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, बिनविरोध निवडीमागे विरोधी उमेदवारांवर दबाव, आमिष किंवा जबरदस्ती करून नामनिर्देशन मागे घ्यायला लावले गेले का, याची सखोल चौकशी करण्यात येणार आहे. विशेषतः मुंबईसह राज्यातील काही संवेदनशील प्रभागांमध्ये अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आयोगाने निवडणूक अधिकाऱ्यांना सतर्कतेचे आदेश दिले असून नियमभंग आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र उमेदवारांना पुन्हा नामनिर्देशन दाखल करण्याची कोणतीही तरतूद नसल्याने या प्रक्रियेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.




कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेत भाजपचे १४ तर शिवसेना शिंदे गटाचे ६ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. याशिवाय पिंपरी-चिंचवड, जळगाव या महापालिकांमध्ये किमान एक भाजपा उमेदवार बिनविरोध विजयी झाला आहे. या बिनविरोध निवडींमुळे सत्ताधारी पक्षांना निवडणुकीआधीच मोठा फायदा होत असल्याचे चित्र आहे. मात्र विरोधकांकडून यावर सातत्याने आक्षेप घेतले जात असून लोकशाही प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.
दरम्यान, निवडणूक आयोगाच्या या आदेशानंतर बिनविरोध निवडून आलेल्या नगरसेवकांचे धाबे दणाणले असून,तपासणीत बरेच काही बाहेर येणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## कार्याध्यक्ष विनोद कुळकर्णींच्या तोंडाला फासले काळे

### मराठी साहित्य संमेलनाला गालबोट

■ **वृत्तसंस्था, सातारा, दि. ३ :**
सातारा येथे आयोजित अखिल भारतीय मराठी संमेलनात आज एक खळबळजनक घटना घडली. या संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्या तोंडाला आज एका व्यक्तीने काळे फासले. हा व्यक्ती रिपाइंचा कार्यकर्ता असल्याचा दावा केला जात आहे. त्याने विनोद कुलकर्णी यांच्या तोंडाला काळे का फासले? हे अद्याप स्पष्ट झाले नाही.
साताऱ्यातील मराठी साहित्य संमेलनाचे शुक्रवारी सकाळी साहित्यिक डॉक्टर मृदुला गर्ग यांच्या हस्ते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन झाले. त्यानंतर आज दुसऱ्या दिवशी संमेलनात वेगवेगळे कार्यक्रम सुरू असताना संदीप जाधव नामक एका व्यक्तीने संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्यावर हल्ला केला. त्याने विनोद कुलकर्णी यांच्या तोंडाला काळे फासले.
अचानक घडलेल्या या घटनेमुळे सर्वचजण स्तब्ध झाले. स्वतः कुलकर्णी यांनाही काहीक्षण काय झाले हे समजले नाही. संदीप जाधव यांनी हा हल्ला का केला? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण ते रिपाइंचे कार्यकर्ते असल्याचे सांगितले जात आहे.
या घटनेचा एक व्हिडिओही सोशल मीडियात व्हायरल झाला आहे. त्यात गळ्यात निळा रुमाल असलेले संदीप जाधव 'जय जवान, जय किसान'च्या घोषणा देत विनोद कुलकर्णी यांच्या तोंडाला काळे फासताना दिसत आहेत. काळे फासल्यानंतर हल्लेखोर राष्ट्रगीत म्हणतानाही व्हिडिओत दिसत आहे.
ही घटना व्यासपीठावर जाणाऱ्या पायऱ्यांजवळ घडली. त्यानंतर आयोजकांनी विनोद कुलकर्णी यांना सावरत दुसऱ्या बाजूला नेले. शाहूपुरी पोलिसांनी आंदोलनकर्त्याला ताब्यात घेतले आहे. त्यांनी गनिमी कावा करून हे आंदोलन केले. केमिकलमुळे विनोद कुलकर्णी यांना श्वास घेण्याचा त्रास होत आहे.

# प्रसुतीसाठी ६ किमी पायपीट

## बाळ पोटातच दगावले : मातेचाही करुण अंत

■ **महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि.३ :**
गडचिरोली जिल्ह्याच्या एटापल्ली तालुक्यात एका मातेला प्रसूतीसाठी रस्ते आणि डॉक्टरांच्या अभावी आपला प्राण गमवावा लागला आहे.



आशा संतोष किरंगा (वय २४) या गर्भवती मातेने आपल्या पोटातील बाळाला वाचवण्यासाठी पतीसोबत ६ किलोमीटरची जंगलमय पायपीट केली, परंतु वेळेत उपचार न मिळाल्याने आधी बाळाचा पोटातच मृत्यू झाला आणि त्यानंतर काही वेळातच मातेनेही अखेरचा श्वास घेतला.
एटापल्ली तालुक्यातील आलदंडी टोला गावातील आशा किरंगा नऊ महिन्यांच्या गर्भवती होत्या. गावात कोणतीही प्रसूती सुविधा उपलब्ध नव्हती. ऐनवेळी प्रसववेदना सुरू झाल्या तर दवाखान्यात कसे पोहचायचे, या भीतीने त्यांनी १ जानेवारी रोजी आपल्या पतीसोबत ६ किलोमीटर अंतरावर असलेल्या पेठा (बहिणीचे गाव) येथे जाण्याचा निर्णय घेतला. हे अंतर त्यांनी घनदाट जंगलातून पायी पार केले.
२ जानेवारीच्या मध्यरात्री आशा यांना तीव्र प्रसववेदना सुरू झाल्या. आशासेविकेच्या मदतीने त्यांना तातडीने हेडरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. मात्र, तिथे तपासणी केली असता बाळ पोटातच दगावल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या धक्क्याने आणि वाढत्या रक्तदाबाने आशा यांची प्रकृती वेगाने खालावली आणि उपचारादरम्यान त्यांचाही मृत्यू झाला.

**मृत्यूनंतर शवविच्छेदनासाठी वणवण**

मृत्यूनंतरही या मातेच्या नशिबी असलेली वणवण थांबली नाही. शवविच्छेदनासाठी बाळ आणि मातेचे शव हेडरी येथून एटापल्ली ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले, परंतु त्या ठिकाणी स्त्रीरोग तज्ज्ञ उपलब्ध नव्हते.
त्यानंतर दोघांचे मृतदेह पुन्हा ४० किलोमीटर अंतरावरील अहेरी उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. शुक्रवारी दुपारी शवविच्छेदन झाल्यानंतर मृतदेह नातेवाइकांना सुपूर्द करण्यात आले.
मृत्यूनंतरही या मातेच्या वाट्याला आलेली वणवण पाहून नातेवाईकांनी संताप व्यक्त केला आहे. या घटनेने संपूर्ण राज्य सुन्न झाले असून आदिवासी भागातील आरोग्य सेवेच्या चिंधड्या उडाल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे. या घटनेमुळे गडचिरोलीच्या दुर्गम भागातील आदिवासी बांधवांच्या आरोग्याचा आणि दळणवळणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. यापूर्वीही गडचिरोली जिल्ह्यात रस्ता नसल्याने झोळीतून, कावड करून रुग्णांना रुग्णालयात नेण्यात आल्याचे अनेकदा समोर आले आहे. प्रगत महाराष्ट्रात आजही एका महिलेला प्रसूतीसाठी जंगलातून पायी प्रवास करावा लागतो आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या अभावामुळे जीव गमवावा लागतो, ही बाब अत्यंत लाजिरवाणी ठरली आहे.

## अमेरिकेचा व्हेनेझुएलावर हल्ला

■ **वृत्तसंस्था, काराकस, दि. ३ :**
अमेरिकेने व्हेनेझुएलाच्या राष्ट्राध्यक्षांना ताब्यात घेतल्याचा दावा केला आहे. ट्रम्प यांनी अलीकडेच सोशल मीडियावर पोस्ट केले आहे की अध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नी सिलिया अडेला फ्लोरेस हे आता अमेरिकन सैन्याच्या ताब्यात आहेत आणि त्यांना व्हेनेझुएलातून बाहेर काढण्यात आले आहे.
ट्रम्प म्हणाले की ते आज रात्री ८ वाजता (भारतीय वेळेनुसार) पत्रकार परिषदेत या प्रकरणाची संपूर्ण माहिती देतील. तथापि, व्हेनेझुएलाने ट्रम्पच्या दाव्याला अद्याप प्रतिसाद दिलेला नाही.
अमेरिकेने काल रात्री २ वाजता व्हेनेझुएलाच्या चार शहरांवर हल्ले केले. अमेरिकन मीडिया सीबीएस न्यूजनुसार, ट्रम्पने व्हेनेझुएलातील लष्करी सुविधा आणि अनेक प्रमुख ठिकाणांवर हल्ले करण्याचे आदेश दिले. अमेरिकेच्या हल्ल्यानंतर, व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांनी एक निवेदन जारी केले ज्यामध्ये बदला घेण्याचे आश्वासन दिले.

## रश्मी शुक्ला सेवानिवृत्त : सदानंद दाते नवे डीजीपी

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३ :**
महाराष्ट्राच्या पहिल्या महिला पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला ३७.५ वर्षांच्या प्रदीर्घ आणि यशस्वी कारकिर्दीनंतर आज सेवानिवृत्त झाल्या. मुंबईतील नायगाव पोलिस मैदानावर आयोजित एका सोहळ्यात त्यांना निवृत्तीनिमित्त 'गार्ड ऑफ ऑनर' देऊन मानवंदना देण्यात आली.
१९८८ च्या बॅचच्या आयपीएस अधिकारी असलेल्या शुक्ला यांनी आपल्या कार्यकाळात राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखल्याचे समाधान व्यक्त केले.
पोलिस महासंचालकपदाची धुरा आता सदानंद दाते यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.
सदानंद दाते यांनी राज्याच्या विविध भागात यापूर्वी यशस्वीरित्या कार्य केले आहे.



## सरकारने गांधींना दुसऱ्यांदा मारले : सिद्धरामय्या

■ **वृत्तसंस्था, बेंगळुरू, दि. ३ :**
कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी शनिवारी मनरेगा योजनेऐवजी आणलेल्या विकसित भारत गॅरंटी रोजगार आजीविका मिशन (ग्रामीण) कायद्यावर टीका केली. ते म्हणाले की, महात्मा गांधींना पहिल्यांदा गोडसेने मारले होते. पण मनरेगा संपवून केंद्र सरकारने दुसऱ्यांदा महात्मा गांधींना मारले आहे.



बंगळूरु येथील एका कार्यक्रमात सिद्धरामय्या म्हणाले की, मनरेगाचा उद्देश गरीब आणि लहान शेतकऱ्यांना फायदा पोहोचवणे हा होता, पण मोदी सरकारने राज्यांशी सल्लामसलत न करता हा निर्णय घेतला, जो हुकूमशाही वृत्ती दर्शवतो.
सिद्धरामय्या यांनी भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्यावर महिला, दलितांचा विरोध केल्याचाही आरोप केला.

## लक्षात ठेवा!

### भाजप प्रदेशाध्यक्षांचा दादांना थेट इशारा



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि.३ :**
सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी भाजपवर भ्रष्टाचाराचे केलेले आरोप भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या चांगलेच जिव्हारी लागलेत.
त्यांनी आज पत्रकारांशी संवाद साधताना थेट अजित पवारांनाच निर्वाणीचा इशारा दिला. अजित पवार पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पक्षाविषयी बोलत आहेत हे त्यांनी लक्षात घ्यावे, असे ते म्हणालेत. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही या प्रकरणी अजित पवारांना मनभेद किंवा मतभेद निर्माण होतील असे विधान टाळण्याचा सल्ला दिला आहे.
अजित पवारांनी शुक्रवारी या प्रकरणी पत्रकारांशी संवाद साधताना भाजपवर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. भाजपने मागच्या ७ वर्षांत महापालिका अक्षरशः लुटून खाल्ली. या लुटारुंना रोखण्यासाठी आम्ही एकत्र आलोत, असे ते म्हणाले होते. त्यावरून भाजपाचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी खडसावले आहे.






# ६०–६५ नगरसेवक बिनविरोध कसे?

## संजय राऊतांचा भाजपला थेट सवाल



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १ :** राज्यात सुरू असलेल्या महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बिनविरोध निवडींवरून खासदार संजय राऊत यांनी भाजपवर हल्लाबोल केला आहे.

काय म्हणून यांचं कर्तृत्व की त्यांना बिनविरोध निवडून दिलं जातंय? असा थेट सवाल करत राऊतांनी सत्ताधा?्यांवर संशयाची छाया टाकली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात बिनविरोध निवडी होणं हे लोकशाहीसाठी धोकादायक असून, यामागे दबाव, भीती आणि गैरप्रकार असल्याचा आरोप त्यांनी केला.

संजय राऊत म्हणाले, ६० ते ६५ उमेदवार बिनविरोध कसे काय निवडून येतात? हे कोणत्या विकासकामांच्या, कोणत्या लोकहिताच्या कर्तृत्वावर? असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी भाजपच्या सत्ताकाळातील कामगिरीवर प्रश्नचिन्ह निर्माण केलं. बिनविरोध निवडी ही लोकशाहीची हत्या असून, मतदारांचा हक्क हिरावून घेतला जात असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला.

निवडणूक आयोगावरही राऊतांनी सडकून टीका केली. निवडणूक आयोग म्हणजे भ्रष्टाचाऱ्यांच्या ताटाखालचं मांजर झालं आहे, अशा तीव्र शब्दांत त्यांनी आयोगाच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली. बिनविरोध निवडींची सखोल चौकशी झाली पाहिजे, अन्यथा लोकशाहीवरील विश्वास उडेल, असा इशाराही त्यांनी दिला.

देशातील आणि जगातील लोकशाही इतिहासात इतक्या मोठ्या संख्येने उमेदवार बिनविरोध निवडून येण्याची उदाहरणे नसल्याचे सांगत राऊत यांनी याला लोकशाहीसाठी धोकादायक प्रवृत्ती ठरवले. अटल बिहारी वाजपेयी, बॅरिस्टर नाथ पै, वसंतदादा पाटील, राम मनोहर लोहिया किंवा आजचे पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील कधी बिनविरोध निवडून आले नाहीत. मग महाराष्ट्रात एवढे लोक कोणत्या कर्तृत्वावर बिनविरोध निवडून येत आहेत? असा सवाल त्यांनी केला.

महाराष्ट्रात बिनविरोध निवडींसाठी साम, दाम, दंड, भेद या सगळ्या पद्धती वापरल्या जात आहेत. समोरच्या उमेदवारांवर दबाव टाकणे, धमक्या देणे आणि प्रचंड आर्थिक आमिष दाखवणे हा एक नवीन राजकीय ट्रेंड तयार झाला आहे. देशाच्या नव्हे तर जगाच्या इतिहासात इतक्या संख्येने बिनविरोध निवडी कधी झाल्या नव्हत्या. हे आकडे पत्रकार, राजकीय विश्लेषक आणि सामान्य जनतेला देखील हादरवणारे आहेत, महाराष्ट्रात लोकशाही प्रक्रिया जाणीवपूर्वक मोडीत काढली जात आहे असे ते म्हणाले. उमेदवारांना माघार घ्यायला लावण्यासाठी पाच-पाच कोटी रुपयांच्या ऑफर दिल्या गेल्याची चर्चा आहे. कल्याणमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहर प्रमुख मनोज घरत यांना माघार घेण्यासाठी देण्यात आलेला आकडा पाहून डोळ्याची बुबुळ बाहेर पडेल, असे राऊत म्हणाले. जळगावमध्ये तर उमेदवारांनी माघार घ्यावी म्हणून घराघरांत कोट्यवधी रुपयांच्या बॅगा पोहोचवल्याचा आरोप त्यांनी केला.

## सावित्रीबाई फुलेंचे जन्मगाव नायगावच्या नामांतराची मागणी

# ठराव पाठवल्यास विनाविलंब निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मगावी म्हणजेच नायगाव येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक मोठी घोषणा केली आहे. नायगावचे नामांतर सावित्रीबाईंच्या नावाने करावे अशी मागणी होत आहे; जर ग्रामसभेने तसा ठराव दिला, तर राज्य मंत्रिमंडळ एका मिनिटात त्याला मंजुरी देईल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९५ व्या जयंतीनिमित्त नायगाव येथे आयोजित कार्यक्रमात राज्याचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी नायगावचे नामांतर क्रांतीज्योती सावित्रीनगर करण्याची मागणी केली होती. या मागणीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

नायगावच्या ग्रामसभेने तसा निर्णय घ्यावा आणि तो प्रस्ताव मंत्री जयकुमार गोरे यांच्यामार्फत सरकारकडे पाठवावा. असा प्रस्ताव आल्यास आमचे मंत्रिमंडळ विनाविलंब त्याला विनाविलंब मंजुरी देईल, असे आश्वासन फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री म्हणाले की, मागील वर्षी याच दिवशी मी नायगावला आलो होतो आणि १० एकर जागेवर स्मारक उभारण्याची घोषणा केली होती. या कामाची जबाबदारी मी मंत्री जयकुमार गोरे यांच्यावर सोपवली होती. घोषणेच्या एका वर्षाच्या आत जागा मिळणे, आराखडा मंजूर होणे



आणि प्रत्यक्ष कामाचे टेंडर निघून सुरुवात होणे, असे यापूर्वी कधीच घडले नव्हते. जयकुमार गोरे यांनी रेकॉर्ड स्पीडमध्ये हे काम पूर्ण करून दाखवले आहे, असे गौरवोद्गार फडणवीस यांनी काढले.

### 'फ्लड डायव्हर्शन'चा पहिला टप्पा लवकरच

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगलीत भाजपच्या महापालिका निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ फोडला. यावेळी त्यांनी सांगली व कोल्हापूर सारख्या शहरांचे पुराच्या पाण्यापासून संरक्षण करण्यासाठी फ्लड डायव्हर्शन प्रकल्पाचा पहिला टप्पा लवकरच सुरू होणार असल्याचे स्पष्ट केले. फ्लड डायव्हर्शन प्रकल्पामुळे सांगली व कोल्हापूर सारख्या शहरांचे पुराच्या पाण्यापासून संरक्षण होईल. हे पाणी पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील दुष्काळी भागाकडे वळवले जाईल. यामुळे एकीकडे आपल्या शहरांना पुराच्या पाण्यामुळे संरक्षण मिळेल आणि दुसरीकडे दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना जिवनदान मिळेल, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री म्हणाले, सांगली व कोल्हापुरात आलेल्या महापुरात अमाप नुकसान झाले. त्यानंतर आम्ही फ्लड डायव्हर्शनचा पहिला प्रोजेक्ट राबवण्याचा निर्णय घेतला. २ टप्प्यांत होणाऱ्या या प्रकल्पावर ४ हजार कोटींचा खर्च होणार आहे. त्याचा सांगलीतील पहिला पहिला टप्पा लवकरच सुरू होणार आहे. त्यासाठी 591 कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे पुराचे पाणी शहरात न येता पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील दुष्काळी भागात वळवण्यात येईल.

सावित्रीबाई फुले यांनी दाखवलेल्या मार्गावर चालताना केवळ स्मारक बांधणे हा आमचा हेतू नाही, तर महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हे आमचे लक्ष्य आहे, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. आता केवळ स्मारक करणार नाही, तर महिलांना अधिकारिता देण्यासाठी, ज्या ज्या गोष्टींची गरज आहे, त्या सगळ्या गोष्टी याठिकाणी असतील. त्याचे प्रशिक्षण याठिकाणी असेल.

ग्रामविकास आणि महिला बाल कल्याण खात्याने मिळून लाडक्या बहिणींना लखपती दीदी करायचे ठरवले आहेत. लाडक्या बहिणींना सक्षम करणे ही आमची जबाबदारी आहे. आजपर्यंत महाराष्ट्रात ५० लाख पेक्षा जास्त लखपती दीदी आपण केल्यात. आता यावर्षी १ कोटी पर्यंत आपण पोहोचू. सातारा जिल्ह्यात देखील दीड लाख लाडक्या बहिणी या लखपती दीदी झालेल्या आहेत.

नामांतराच्या मुद्द्यावर अधिक स्पष्टपणे बोलताना फडणवीस म्हणाले की, महात्मा ज्योतिराव फुलेंनी आणि सावित्रीबाई फुलेंनी दाखवलेल्या मार्गाने चालण्याचा प्रयत्न आम्ही करू. नायगावचे नामांतर सावित्रीबाईंच्या नावाने करण्याची मागणी आलेली आहे. या ग्रामसभेने असा निर्णय घेतला आणि जयकुमार गोरेंनी ग्रामविकास विभागाच्या मार्फत माझ्यापर्यंत पाठवला तर, विनाविलंब आमचे मंत्रिमंडळ एका मिनिटात त्याला मान्यता देईन आणि नायगावचे नाव सावित्रीआईंच्या नावाने करण्याचा निर्णय करू, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला.

# उभ्या आयुष्यात अशी निवडणूक पाहिली नाही...

## राज ठाकरेंनी व्यक्त केले आश्चर्य



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३ :** महापालिका निवडणूक प्रक्रियेत उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या तारखेनंतर राज्यातील ७० जागी विरोधी उमेदवारांची माघार किंवा एकच उमेदवार रिंगणात उरल्याने त्यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. यामध्ये महायुतीचे, विशेषतः भाजपचे पारडे जड असल्याचे दिसून येत आहे. या विचित्र राजकीय परिस्थितीवर मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी आश्चर्य व्यक्त करत, उभ्या आयुष्यात मी अशी निवडणूक पाहिली नाही, असे विधान केले.

बाळासाहेब ठाकरेंसोबत अनेक निवडणुका पाहिल्या, पण अशी निवडणूक जी इतक्या उमेदवारांना बिनविरोध करते. हे पहिल्यांदाच मी पाहतोय, असे राज ठाकरे म्हणाले.

बिनविरोध निवडून येणाऱ्या उमेदवारांमध्ये भारतीय जनता पक्षाने मोठी आघाडी घेतली असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनेही जोरदार मुसंडी मारली आहे. आतापर्यंत भाजपचे ४४ नगरसेवक बिनविरोधी निवडून आले आहेत. त्यापाठोपाठ शिवसेना शिंदे गटाच्या २२ उमेदवारांनी बिनविरोध विजय मिळवला आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे २, इस्लाम पार्टीचा १ (मालेगाव) आणि अपक्ष १ असे एकूण 70 नगरसेवक महानगरपालिका निवडणुकीत बिनविरोध निवडून आले आहेत.

दरम्यान, महानगरपालिका निवडणुकीत उमेदवार बिनविरोध निवडून आल्यानंतर विरोधी पक्षातील अनेक नेत्यांनी भाजपासह सत्ताधारी महायुतीवर टीका करीत निवडणूक आयोगावरही तोंडसुख घेणे सुरू केल्याचे दिसून येत आहे.

# शरद पवारांसह राज्यातील सात खासदारांची यावर्षी निवृत्ती

## राज्यसभेत वर्षात मोठी उलथापालथ : महाराष्ट्रासह देशभरात सत्तासमीकरण बदलणार?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :** राज्यसभेच्या राजकारणात येत्या वर्षात मोठ्या उलथापालथी घडण्याची चिन्हे दिसत असून 2026 हे वर्ष संसदीय राजकारणासाठी अत्यंत निर्णायक ठरणार आहे. म

हाराष्ट्रासह देशभरातील अनेक दिग्गज नेत्यांचा राज्यसभेतील कार्यकाळ पूर्ण होत असून एकूण 71 खासदार निवृत्त होणार आहेत. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह महाराष्ट्रातील सात खासदारांचा समावेश आहे. दुसरीकडे, भाजपचे सर्वाधिक 30 खासदार याच वर्षी राज्यसभेतून बाहेर पडणार असल्याने सत्ताधारी आणि विरोधी पक्षांसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची ठरणार आहे.

2026 मध्ये केवळ राज्यसभा निवडणुका नाहीत, तर देशातील पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार असल्याने राजकीय हालचालींना अधिक वेग येणार आहे. या पार्श्वभूमीवर राज्यसभेतील जागांची गणितं आणि नव्या उमेदवारांची चाचपणी सुरू झाली आहे.

यंदा राज्यसभेतील एकूण 71 खासदारांचा कार्यकाळ संपत असून मार्च महिन्यात 1, एप्रिलमध्ये सर्वाधिक 37, जूनमध्ये 22 तर नोव्हेंबरमध्ये 11 खासदार निवृत्त होणार आहेत. या निवृत्तीमुळे संसदेच्या वरच्या सभागृहातील राजकीय समतोलावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

राज्यसभेच्या एकूण 245 जागांपैकी एप्रिल, जून आणि नोव्हेंबर 2026 या कालावधीत 73 जागांसाठी निवडणूक होणार आहे. या निवडणुकांमध्ये केंद्रीय मंत्र्यांसह अनेक दिग्गज नेत्यांचा कार्यकाळ संपत असल्याने पक्षांमधील अंतर्गत रणनीती, आघाड्या आणि समीकरणं बदलण्याची शक्यता आहे.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांचा कार्यकाळ 25 जून 2026 रोजी संपणार असून ते निवृत्त होणाऱ्या नेत्यांमधील सर्वात मोठे नाव मानले जात आहे. त्याचप्रमाणे माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा हेही याच कालावधीत राज्यसभेला अलविदा म्हणणार आहेत.

महाराष्ट्राच्या राजकारणाकडे पाहिल्यास, राज्यातील सात राज्यसभा खासदारांचा कार्यकाळ 2 एप्रिल 2026 रोजी संपत आहे. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचे नाव सर्वाधिक चर्चेत आहे. त्यांच्या सोबत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, भाजपचे माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड आणि खासदार धैर्यशील मोहन पाटील हेही निवृत्त होत आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी, काँग्रेसच्या रजनी पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या डॉ. फौजिया खान यांचाही कार्यकाळ याच दिवशी संपणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातून नव्या चेहऱ्यांना संधी मिळणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# माझे तिकडे जाणे अयोग्य होते : राहुल नार्वेकर



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :** विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी माजी खासदार हरिभाऊ राठोड यांच्यासोबतच्या वादाच्या व्हायरल झालेल्या व्हिडिओवर स्पष्टीकरण दिले आहे. मी पोलिंग स्टेशनवर जाणे अयोग्य होते, तर हरिभाऊ राठोड तिकडे कशासाठी गेले होते? ते तिकडे पूजा करण्यासाठी गेले होते का? आम्ही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानानुसार कार्य करतो. संविधानाचा सन्मान आहे म्हणूनच आम्ही त्यातील तरतुदींचा कुठेही भंग होणार नाही याची काळजी घेतो, असे ते म्हणालेत.

एका पोलिंग स्टेशनवर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर व माजी खासदार हरिभाऊ राठोड यांच्यात शाब्दिक चकमक झाली. त्यानंतर नार्वेकरांनी राठोड यांचे पोलिस संरक्षण काढून घेण्याचे आदेश सहपोलिस आयुक्तांना दिले. या प्रकरणी टीकेची झोड उठल्यानंतर नार्वेकरांनी आज एका वृत्तवाहिनीशी बोलताना आपली बाजू स्पष्ट केली आहे.

राहुल नार्वेकर म्हणाले, आमच्या पक्षाच्या सर्व आमदारांनी आपापल्या मतदारसंघातील नगरसेवकांसोबत जाऊन अर्ज भरला. मी पण कुलाब्याचे प्रतिनिधित्व करतो. त्यामुळे मी सुद्धा माझ्या भागातील नगरसेवक व उमेदवारांसोबत जाऊन त्यांचा फॉर्म भरणे हे स्वाभाविकच आहे. कारण, आपला आमदार आपल्यासोबत यावा हे उमेदवारांनाही अपेक्षित असते. त्यानुसार मी तिकडे गेलो होतो. निवडणूक आयोगाचा नियम आहे की, एका उमेदवारासोबत २ प्रतिनिधी जाऊ शकतात. नियमानुसार मी तिकडे गेलो होतो. स्वतःला दिलेल्या सुरक्षेचा गैरवापर करून वातावरण तंग करणे हा कोणता प्रकार आहे? संबंधित अधिकाऱ्यांना त्याची माहिती देऊन त्यासंबंधी कारवाई करण्याची सूचना करणे हे माझे कर्तव्य असल्याचे नार्वेकर म्हणाले.

# साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखकास साहित्य संमेलनात प्रवेश नाकारला



■ **वृत्तसंस्था, सातारा, दि. ३ :** साहित्य संमेलनाच्या उद्घाटन समारंभासाठी साताऱ्यात आलेल्या एका युवकाला केवळ काळे कपडे परिधान केल्याच्या कारणावरून कार्यक्रमस्थळी प्रवेश नाकारण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. हा युवक युवा साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक प्रदीप कोकरे असल्याचं समोर आलं आहे.

या घटनेबाबत लेखक प्रदीप कोकरे यांनी आपल्या फेसबुक पोस्टद्वारे सविस्तर माहिती दिली आहे. त्यांनी म्हटलं आहे की, आपण काळे कपडे परिधान केल्यामुळे पोलिसांनी कार्यक्रम स्थळी जाण्यास मज्जाव केला. प्रवेश का नाकारला, अशी विचारणा केल्यानंतर पोलिसांनी वरिष्ठांचा आदेश आहे असं उत्तर दिलं, असंही त्यांनी पोस्टमध्ये नमूद केलं आहे. कार्यक्रमादरम्यान उभं राहून कुणी निषेध व्यक्त करू नये, यासाठी काळे कपडे घातलेल्या व्यक्तींना आत सोडू नये, अशा सूचना असल्याचं पोलिसांनी सांगितल्याचा दावा कोकरे यांनी केला आहे.

# ६६ नगरसेवक बिनविरोध, लोकशाहीच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

## मतदानाआधीच निकाल?



दिपक कैतके
मुंबई.

राज्यात तब्बल नऊ वर्षांनंतर होत असलेल्या महानगरपालिका निवडणुकांआधीच राजकीय वातावरणात प्रचंड खळबळ उडाली आहे. २९ महानगरपालिकांच्या एकूण २,८६९ जागांसाठी सुरू असलेल्या निवडणूक प्रक्रियेत तब्बल ३३ हजार ६०६ उमेदवार रिंगणात असतानाच, मतदान होण्यापूर्वीच ६६ नगरसेवक बिनविरोध निवडून आल्याचे समोर आले आहे.

इतक्या मोठ्या प्रमाणावर बिनविरोध निवडी होणे ही राज्याच्या महापालिका निवडणुकांच्या इतिहासात दुर्मीळ घटना मानली जात आहे.

या घटनेने केवळ विरोधकच नव्हे, तर सत्ताधारी पक्षांच्याही भुवया उंचावल्या आहेत. विशेष म्हणजे, या ६६ बिनविरोध निवडून आलेल्या नगरसेवकांमध्ये कल्याणडोंबिवली महापालिकेतील उमेदवारांची संख्या सर्वाधिक आहे. त्यामुळे या भागाकडे विशेष लक्ष केंद्रित झाले असून, नेमकं काय घडलं? हा प्रश्न आता सर्वत्र विचारला जात आहे.

नऊ वर्षांनंतर होत असलेल्या या निवडणुकांमध्ये सर्वच पक्षांनी महापालिकेवर सत्ता मिळवण्यासाठी ताकद लावली आहे. काही ठिकाणी युती, काही ठिकाणी आघाडी, तर अनेक ठिकाणी मित्रपक्षही एकमेकांच्या विरोधात उभे ठाकलेले दिसत आहेत. अशा बहुपक्षीय आणि तीव्र स्पर्धेच्या वातावरणात मतदानाआधीच मोठ्या प्रमाणावर बिनविरोध निवडी होणे, हे संशयास्पद असल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यातच या बिनविरोध विजयी उमेदवारांपैकी बहुसंख्य उमेदवार सत्ताधारी पक्षांचे असल्याचे चित्र पुढे आले आहे.

या पार्श्वभूमीवर विरोधकांनी तीव्र नाराजी व्यक्त करत या संपूर्ण प्रकरणाची चौकशी व्हावी अशी मागणी केली आहे. विशेष म्हणजे, केवळ विरोधकच नव्हे तर सत्ताधारी पक्षातील काही नेत्यांनीही या प्रकाराबाबत चौकशीची गरज असल्याचे मत व्यक्त केले आहे. त्यामुळे हा विषय अधिक गंभीर बनला आहे.

या सर्व घडामोडींची गंभीर दखल घेत निवडणूक आयोगाने संबंधित महानगरपालिकांकडून सविस्तर अहवाल मागवण्याचे आदेश दिले आहेत. आयोगाने स्पष्ट निर्देश दिले असून, बिनविरोध निवडी कशा झाल्या, याचा आढावा घेतला जाणार आहे.

आयोगाने अधिकाऱ्यांना विचारले आहे की, उमेदवारांनी नेमक्या कोणत्या वेळी अर्ज माघारी घेतले? त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा राजकीय किंवा प्रशासकीय दबाव टाकण्यात आला का? आर्थिक किंवा अन्य स्वरूपाची प्रलोभने देण्यात आली का? तसेच अर्ज माघारीच्या प्रक्रियेत नियमांचे उल्लंघन झाले का? याची सविस्तर माहिती अहवालात नमूद करावी.

महत्त्वाची बाब म्हणजे, निवडणूक आयोगाकडून आलेल्या अहवालांची छाननी झाल्यानंतरच या बिनविरोध निवडून आलेल्या नगरसेवकांची नावे अधिकृतपणे जाहीर केली जाणार आहेत. त्यामुळे सध्या जरी बिनविरोध निवड झाल्याची चर्चा असली, तरी अधिकृत शिक्का आयोगाच्या तपासणीनंतरच बसणार आहे.

दरम्यान, एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, मुंबईतील कुलाबा विधानसभा मतदारसंघातील तीन वॉर्डांमध्ये उमेदवारांवर दबाव टाकून अर्ज भरण्यापासून रोखण्यात आल्याचा आरोप काही पक्षांनी केला आहे.

या प्रकरणी निवडणूक अधिकारी, निवडणूक प्रभारी तसेच पोलीस आयुक्तांकडून सविस्तर अहवाल मागवण्यात आला आहे. हा मुद्दा केवळ प्रशासकीय नसून थेट लोकशाही प्रक्रियेच्या विश्वासाशी संबंधित असल्याने आयोग विशेष सावध भूमिका घेत असल्याचेही सूत्रांनी सांगितले.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना राज्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी चौकशीची मागणी करताना, बिनविरोध निवडी या स्थानिक विकासाच्या मुद्द्यांवरील सहमतीमुळे झाल्याचा दावा केला. महाराष्ट्र हे प्रगल्भ राज्य आहे. येथे कोणावर दबाव टाकून उमेदवारी मागे घ्यायला लावली जात नाही. स्थानिक प्रश्नांवर एकमत झाल्यामुळे काही उमेदवारांनी परस्पर पाठिंबा दिला, असे त्यांनी स्पष्ट केले. अशा प्रकारच्या सहमतीला त्यांनी चांगला पायंडा असे संबोधले.

मात्र, ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी या दाव्याला जोरदार विरोध करत सरकारवर गंभीर आरोप केले. ६६ उमेदवार बिनविरोध कसे निवडून आले, हे सर्वांनाच माहीत आहे. साम, दाम, दंड, भेद–हा नवा पॅटर्न आहे, असा आरोप त्यांनी केला. अर्ज माघारी घेण्याच्या अंतिम मुदतीबाबतही त्यांनी शंका उपस्थित करत, नियम शिथिल करण्यात आल्याचा दावा केला.

एकीकडे निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना, दुसरीकडे मतदानाआधीच ठरलेल्या या निकालांमुळे लोकशाही प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बिनविरोध निवड या संकल्पनेत कायदेशीरदृष्ट्या काहीही गैर नसले, तरी एवढ्या मोठ्या प्रमाणावर अशा निवडी होणे हे स्वाभाविक आहे की व्यवस्थात्मक हस्तक्षेपाचे लक्षण, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

आता सर्वांचे लक्ष निवडणूक आयोगाच्या अहवालाकडे लागले आहे. या अहवालातून नेमके काय समोर येते, बिनविरोध निवडी या विकासाच्या राजकारणाचे प्रतीक ठरतात की दबाव व सत्तेच्या खेळीचे पदार्फाश करतात–यावरच या संपूर्ण प्रकरणाचा पुढील राजकीय आणि प्रशासकीय प्रवास ठरणार आहे. ■ ■

# चलता है... ही मानसिकता बदलायला हवी!



दीपक मोहिते
पालघर.

आपल्या देशाने तीन वर्षांपूर्वी स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण केले,त्यावेळी सरकारने वर्षभर विविध साजरे केले.आपल्या संविधानालाही आता ७५ वर्षे पूर्ण होउन येत्या २६ जाने. रोजी आपण ७६ व्या वर्षात पदार्पण करत आहोत.

देशाच्या जडणघडणीत भारतीय संविधानाने मोलाची कामगिरी बजावली. सर्वसामान्यजनाचे हक्क व अधिकाराचे रक्षण करणारे आपले संविधान अल्पावधित जगभरात नावारूपाला आले.

७५ वर्षाच्या काळात आपल्या देशाने विकासाच्या बाबतीत बऱ्यापैकी कात टाकली व आज आपण महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करू लागलो आहोत.या काळात संरक्षण, अन्नधान्य, उद्योगधंदे, रोजगार व कृषी क्षेत्रात आपण स्वयंपूर्ण झालो. मात्र शिक्षण व आरोग्य क्षेत्रात आपण आजही मागासलेलेच आहोत. या दोन्ही क्षेत्रात जी काही कामगिरी झाली ती केवळ शहरी भागापुरती मर्यादित राहिली. ग्रामीण भाग मात्र कायम उपेक्षित राहिला.

काही वषार्पूर्वी नववर्षदिनी उ. महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्ह्यात घडलेल्या एका घटनेने साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले होते. त्यावेळी या जिल्ह्यातील डूनेल या गावात सुजवा या आदिवासीपाड्यावर राहणाऱ्या जोलाबाई या महिलेचा प्रसूतीदरम्यान मृत्यू झाला होता.

तिच्या बाळाची प्रकृतीही चिंताजनक झाली होती. त्याला जगवण्यासाठी त्याच्या आजीने परिस्थिती नसतानाही प्रयत्नांची पराकाष्ठा केली. आईच्या दुधापासून वंचित या बाळाला डॉक्टरांनी बाहेरचे दूध पाजू नका, असा सल्ला दिला होता. त्यामुळे त्याची आजी बाळाला जगवायचे कसे ? अशा विवंचनेत सापडली होती.

पुढील उपचारासाठी हाती पैसा अडका देखील नव्हता, गावात आरोग्य सोयी सुविधांचा अभाव होता, अशा परिस्थितीत त्या आजीबाईने बाळाला जगवण्यासाठी जीवाचे रान केले. ही घटना, ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेचे विदारक चित्र स्पष्ट करणारी आहे.

गेल्या काही वर्षात अनेक आदिवासी जिल्ह्यात असंख्य गरोदर मातांचे प्रसूतीदरम्यान मृत्यू झाले. यावर उपाययोजना करण्याकामी आपली आरोग्य व वैद्यकीय सेवा परिपूर्ण नाही, तसेच आपले मायबाप सरकार संवेदनशील नाही, हे अधोरेरेखित करते. या सर्व घटनांवरून या जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था कशी असेल? याची आपण कल्पना करायला हवी.

१ जुलै १९९८ रोजी धुळे जिल्ह्यातून बाहेर पडून नंदुरबार या आदिवासी जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. महाराष्ट्र, मध्यप्रदेश व गुजरात सीमालागत असलेला हा जिल्हा गेल्या २८ वर्षात विकासाबाबत कायम दुर्लक्षित राहिला. हा संपूर्ण परिसर आदिवासी बहुल असून निसर्गाच्या संसाधनाने परिपूर्ण असा हा जिल्हा आहे.

येथील सातपुडा रांगात असलेल्या सर्व गावात लोकसंख्येची घनता अत्यंत कमी आहे. या परिसरातील वनात भिल्ल,पारधी व गोमित या आदिवासी जमाती तसेच गावित, कोकणा,पावरी, मावची व धनका हे आदिवासी व कैकाडी, ढेलारी या भटक्या विमुक्त जातीचे लोक मोठ्या संख्येने राहतात.

हा जिल्हा धुळे जिल्ह्यात असतानाही राज्यकर्त्यांनी या भागाकडे कायम दुर्लक्ष केल्यामुळे त्यावेळी वेगळ्या जिल्ह्याची मागणी करण्यात आली. वेगळा जिल्हा अस्तित्वात आला पण नंदुरबारसहित अनेक जिल्ह्यातील लोकांच्या जीवनात सोनेरी पहाट मात्र कधीच उगवू शकली नाही. आजही या जिल्ह्यातील लोक अंधारात चाचपडत आहेत.

जिल्हा आदिवासी असल्यामुळे सारे लोकप्रतिनिधी अनु.जमातीचे आहेत,तरीही हा समाज सोयी सुविधांपासून वंचित आहे. येथील अनेक गावातील आरोग्य यंत्रणा व्हेंटिलेटरवर आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रे असून नसल्यासारखी आहेत. जिल्हा आदिवासी असल्यामुळे निधीची कमतरता नाही, पण त्याच्या विनियोगात प्रचंड गैरप्रकार होत असतात. प्रसूतीदरम्यान होणाऱ्या महिलांचे तसेच कुपोषित बाळांचे मृत्यू हे व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे, पण लोकप्रतिनिधी व सरकारी अधिकारी हे कायम, चलता है... अशा मानसिकतेत आहेत. त्यामुळे अशाप्रकारची मानसिकता बदलण्याची गरज आहे. अतिग्रामीण भागात अशाप्रकारचे वास्तव पाहायला मिळत आहे तर दुसरीकडे मुंबईपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या पालघर जिल्ह्यातही तशीच स्थिती पाहायला मिळते. कुपोषण,बालमृत्यू, गरोदर मातांचे मृत्यू,यांचे या जिल्ह्यात अधूनमधून थैमान पाहायला मिळते. ■ ■

महासागर ●रविवार,दि.४ जानेवारी २०२६
अकोला पान ३

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा आज अकोल्यात प्रचाराचा शंखनाद

## महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अकोला क्रिकेट क्लब मैदानावर जाहीर सभा

■अकोला,दि ३ (प्रतिनिधी)■
राज्यात महापालिका निवडणुकांचा रणसंग्राम सुरू असताना, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अकोला नगरीतून प्रचाराचा शंखनाद करणार आहेत. अकोला महानगरपालिकेतील भारतीय जनता पक्ष व राष्ट्रवादी (अजित पवार) युतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी रविवार, ४ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता, अकोला क्रिकेट क्लब मैदानावर मुख्यमंत्री फडणवीस जाहीर सभेला संबोधित करणार आहेत.या सभेच्या यशस्वी आयोजनासाठी भाजपकडून तब्बल ३५ विविध समित्या गठित करण्यात आल्या आहेत.



महापालिकेतील ७६ उमेदवारांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री अकोल्यात येत असून, या जाहीर सभेला अभूतपूर्व प्रतिसाद मिळेल, असा विश्वास भाजपच्या गोटातून व्यक्त करण्यात येत आहे.सभेच्या तयारीसाठी भाजप प्रदेश सरचिटणीस, आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, आमदार वसंत खंडेलवाल, हरीश पिंपळे, प्रकाश भारसाकळे तसेच राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे आमदार अमोल मिटकरी, भाजप शहर अध्यक्ष जयंत मसने, राष्ट्रवादी (अजित पवार) अकोला शहर अध्यक्ष विजय देशमुख, जिल्हाध्यक्ष बद्रू जमा, भाजप ग्रामीण जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, किशोर मांगटे पाटील, कृष्णा शर्मा, मदन भरगड आदींच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांना विविध जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत.या जाहीर सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहून भाजप व महायुतीच्या उमेदवारांना आशीर्वाद द्यावेत, असे आवाहन भाजपचे निवडणूक प्रमुख विजय अग्रवाल यांनी केले आहे.दरम्यान, आमदार रणधीर सावरकर यांनी सांगितले की, लाडक्या बहिणींना दर महिन्याला निधी देऊन त्यांचा सन्मान राखणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राजराजेश्वर नगरीत येत आहेत. सभेचे नियोजन युद्धपातळीवर सुरू असून, विविध समित्यांच्या माध्यमातून काम काज केले जात आहे. सुरक्षा व्यवस्थेसाठी पोलिसांकडून तपासणी सुरू असून, वाहतूक सुरळीत राहील याचीही दक्षता घेण्यात येत आहे.

## नायलॉन मांजाची विक्री तसेच वापर करणाऱ्यांवर कारवाईची मागणी

■अकोला,दि ३ (प्रतिनिधी)■
मानव, पशुपक्षी आणि पर्यावरणासाठी घातक असलेल्या नायलॉन मांजाची विक्री तसेच वापर करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी सनातन संस्कृती महासंघातर्फे जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. या तक्रारीची प्रत पोलिस अधीक्षक तसेच महानगरपालिका आयुक्त यांनादेखील देण्यात आली आहे. नायलॉन मांजा गळ्यात तसेच दुचाकी वाहनात अडकल्यामुळे अनेकांनी आपले प्राण गमावले असून काहींना कायमस्वरूपी अपंगत्व आले आहे. पक्षी आणि प्राणी यांच्या जिवीतासाठी देखील नायलॉन मांजा धोकादायक आहे. सध्या महानगरपालिका निवडणूकीचे वारे वाहत आहे. १४ जानेवारी रोजी 'मकरसंक्रांत', आहे १५ जानेवारी रोजी मतदान असून १६ ला मतमोजणी होणार आहे. शासकीय यंत्रणा निवडणूक प्रक्रियेत व्यस्त राहिल.

## एका पोलिस अधिकाऱ्याने काढली तरुणीची छेड !

### गुन्हा दाखल बाळापुर पोलिसांनी केली अटक

### पोलीस अधीक्षक यांनी घेतली गंभीर दखल
### पोलिस उपनिरीक्षक निलंबित

■बाळापुर,दि ३ (प्रतिनिधी)■
अकोला जिल्ह्यातून असाच काहीसा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अकोला पोलिसांची अब्रू वेशीवर टांगणारी घटना समोर आलीये. चक्क एका पोलिस अधिकाऱ्याने तरुणीची छेड काढल्याचा आरोप करण्यात आलाय. बाळापूर पोलीस स्टेशनला या प्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. शंकर सुरेश बोंडे असं तरुणीची छेड काढणाऱ्या पोलीस उपनिरीक्षकाचे नाव आहे. पीएसआय बोंडे अकोल्यातील रामदास पेठ पोलीस ठाण्यात कार्यरत आहे. आज बाळापुर पोलिसांनी तरुणीची छेड केल्याप्रकरणी अटक केली. तसेच त्याच्याविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. मात्र, या घटनेमुळे अकोला पोलीस दलात मोठी खळबळ उडाली. सद्यस्थित अकोला शहरात ही तरुणी भाड्याने राहते. आणि बाळापुर शहरातल्या नगरपालिकेत डाटा एन्ट्री ऑपरेटर म्हणून कार्यरत आहे. नेहमीप्रमाणे येथे दररोज या ठिकाणी अकोल्याहून बाळापुर येथे राष्ट्रीय महाम ार्गाने अपडाऊन करतेये. आजही सायंकाळच्या सुमारास नगरपालिका कार्यलयातील काम आटोपून बाळापूरहून अकोल्याकडे निघाली असता, वाटेतच एक पोलीस अधिकारी तिच्या मार्गावर लागला. काही किमी अंतरावर तिचा पाठलाग करून थोडं दूर गाडी आडवी लावली, आणि तरुणीला म्हणाला की तुझ्या तोंडाचं सोड मला २ मिनिटे बोलायचे आहे, आणि घाणेरडे तसेचं अश्लील



इशारे करू लागला. त्यानंतर तरुणीने अकोला पोलिसांच्या डायल ११२ वर कॉल केला. तिथे जुने शहर पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी दाखल झाले. फिर्यादी तरुणीला पोलीस मदत मिळाली आणि बाळापूर पोलीस ठाण्यात आणण्यात आलं. पुढ तरुणीच्या तक्रारीनंतर कलम ७८,७९,१२६(२) ए नुसार गुन्हा दाखल करून छेड करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याला अटक करण्यात आली आहे.
शंकर सुरेश बोंडे असं या पीएसआयचं नाव असून तो मूळ पिंपळगाव राजा बुलढाणा जिल्ह्यातील रहिवासी आहे. दरम्यान, अकोला खामगाव राष्ट्रीय महार्गावरील शेळद फाटा ते व्याळा रस्त्यावरील जिओ पेट्रोल पंपासमोर असलेल्या पुलावर ही घटना घडली आहे.. या प्रकरणी बाळापुर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक माधुरी पाटील तपास करीत आहे.

## राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानाद्वारे जनजागृती

**अकोला :** रस्ते अपघातांमध्ये होणारी जीवितहानी टाळण्यासाठी आणि नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने राज्यभर १ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान राबविले जाणार आहे. यानिमित्ताने संपूर्ण राज्यात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत परिवहन विभाग, वाहतूक पोलीस विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, शालेय शिक्षण विभाग तसेच इतर संबंधित संस्था व संघटनांच्या सहकार्याने रस्ता सुरक्षिततेसाठी प्रचार, जनजागृती व जनप्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. नागरिक, वाहनचालक, विद्यार्थी आणि सर्व संबंधित घटकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता वाढविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय (एमओआरटीएच) यांच्या मार्गदर्शनानुसार या कालावधीत प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा, परिसंवाद, वाहनचालक व शालेय विद्यार्थ्यांसाठी जनजागृती सत्रे, नेत्र तपासणी शिबीर तसेच विविध प्रचारात्मक उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

## थोडक्यात

### मुख्य रस्त्यांवरील पथदिव्यांची दुर्दश

**अकोला :** शहरात मुख्य रस्ते बांधून झाल्यानंतर पथदिवे लावण्यात आले मात्र, देखभाल व दुरुस्तीअभावी अर्धे अधिक पथदिवे बंद आहेत. परिणामी वाहनधारकांना अंधाराचा सामना करावा लागत असून अपघात घडत आहेत. महापालिका विद्युत विभाग आपल्या अखत्यारीत नसलेल्या रस्त्यांसाठी एनएचआय कडे बोट दाखवत आहे. दुसरीकडे महापालिकेने बांधलेल्या रस्त्यांची हीच परिस्थिती आहे. अकोला शहरात मुख्य रस्त्यांचे जाळे असून महापालिका हद्दीत असलेला नवीन बायपास तसेच जुना मिनी बायपास व तीन उड्डाणपूल यावर पथदिवे लावण्यात आले आहेत. एनएचआयने बांधलेल्या रस्त्यावरील व उड्डाणपुलावरील पथदिव्यांची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी एनएचआयकडे आहे. शहरातील अंतर्गत मुख्य रस्त्यांवरील पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती महापालिकेकडे आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या रस्त्यांवरील पथदिव्यांची देखभाल व दुरुस्तीअभावी दुर्दशा झाली असून वारंवार पथदिवे बंद होत असल्याची परिस्थिती आहे. महापालिकेचा विद्युत विभाग शहर अंधारात असतानाही झोपा काढत असून आपली जबाबदारी झटकत आहे. परिणामी वाहनधारकांना अंधाराचा सामना करावा लागत असून अपघाताला सामोरे जावे लागत आहे.

### तिळाला १०,६०० रुपये कमाल दर

**अकोला:** अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीत तिळाची आवक थोडीशी वाढून २५ क्विंटलपर्यंत पोहोचली आहे. बाजारात तिळाला शुक्रवारी कमाल प्रतिक्विंटल १०,६०० रुपये, किमान ९,००० रुपये, तर सरासरी १०,००० रुपये दर मिळाल्याची माहिती बाजार समितीत मिळाले. मागील काही दिवसांच्या तुलनेत तिळाची आवक कमी असल्याने बाजारात भाव स्थिर राहिले आहेत. विशेषतः तिळाची मागणी तेलनिर्मिती उद्योग आणि स्थानिक बाजारात वाढल्याने भाव स्थिर राहिला आहे. तिळाच्या भावातील हळूहळू वाढ शेतकऱ्यांसाठी उत्साहवर्धक ठरत असून, पुढील आठवड्यात भावात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

### सोयाबीनला कमाल ४,७३५ रुपये दर

**अकोला:** अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीत शुक्रवारी ३,२७७ क्विंटल सोयाबीनची आवक झाली. बाजारात सोयाबीनला कमाल प्रतिक्विंटल ४,७३५ रुपये, किमान ४,००० रुपये, तर सरासरी ४,६०० रुपये दर मिळाले.

## महिला काँग्रेसच्या अकोला जिल्हा अध्यक्ष पदी सौ.पूजा काळे यांची फेर निवड

■अकोला,दि ३ (प्रतिनिधी)■
महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेस च्या वतीने नुकत्याच जाहीर झालेल्या जिल्हा अध्यक्ष पदाच्या यादीत अकोला जिल्हा महिला अध्यक्ष पदी सौ. पूजा काळे यांची पुन्हा निवड झाली आहे. मागील



काही वर्षात अकोला जिल्ह्यात नावीन्य पूर्ण उपक्रम राबवून महिला चे संघटन अधिक मजबूत करण्याचं काम सौ. पूजा काळे यांनी केले होते त्या कामाची पावती म्हणून त्यांची जिल्हा अध्यक्ष पदी फेर निवड करण्यात आली आहे.

## मुख्यमंत्र्यांची लाडक्या बहिणींना भेट अकोला येण्यापूर्वी

■अकोला,दि ३ (प्रतिनिधी)■
मुख्यमंत्री आणि लाडक्या बहिणींचे देवाभाऊ देवेंद्र फडणवीस यांनी अकोला आगमनापूर्वी लाडक्या बहिणी व बचत गटाच्या महिलांना भेट दिली. स्वयंरोजगाराची उपलब्धता, सामाजिक समरसता, महिला सबलीकरणच्या दिशेने पावलेउचलली आहेत.रविवारी अकोला क्रिकेट क्लब मैदानावर दुपारी १ वाजता होणा-या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभेला उपस्थित राहावे असे आवाहन केले आहे.
राज्य उन्नती अभियानांतर्गत अकोला जिल्ह्याचा उमेद जिल्ह्यात समावेश करून बचत गटाच्या महिलांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा इतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल भाजपा प्रदेश सरचिटणीस आम



दार रणधीर सावरकर, पालकमंत्री आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार प्रकाश भारसाकळे आमदार हरीश पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल, संतोष शिवरकर, विजय अग्रवाल, जयंत मसने, वैशाली शेळके, मायाताई घुले, वैशालीताई पालीवाल, सुलभाताई दुतोंडे, हर्षद साबळे, वैशाली शेळके, एड. रूपाली काकडे, जयश्रीताई फुंडकर सुमनताई गावंडे, गीतां शेगोकार, आदींनी अभिनंदन केले आहे. बचत गटाच्या महिलांना सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून वेगवेगळ्या योजना राज्य शासनाच्या द्वारे उपलब्ध करून देण्यात येत आहेत. खासदार अनुप धोत्रे, आ. रणधीर सावरकर सातत्याने प्रयत्नशील होते.
या प्रयत्नाला पालकमंत्री आकाश कुंडकर यांची साथ मिळाली. त्यांच्या प्रयत्नाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच केंद्र ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंग चव्हाण यांच्याकडे पाठपुरावा केला. त्याची फलश्रुती म्हणजे राज्यातील १३ जिल्ह्यांमध्ये अकोला जिल्ह्याचा समावेश झाल्यामुळे बचत गटाच्या महिलांना स्वयंरोजगाराची संधी प्राप्त होणार आहे.
या संधीचा जवळपास दहा लाख महिलांना लाभ होणार आहे. महिलांना इ-मार्केट फॉर्म बाजारपेठ तसेच वेगवेगळ्या सुविधा या माध्यमातून मिळणार आहे हक्काचे बाजारपेठ उपलब्ध होणार आहे त्यामुळे नागरिकांसोबत मातृशक्तीला सुद्धा याचा लाभ मिळणार आहे. बचत गटाच्या महिलांनी खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर यांच्या अभिनंदन व आभार व्यक्त केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभेमध्ये बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित राहतील असा विश्वास व्यक्त केला आहे.

## पातुर येथे अक्षरांच्या जननीला शब्दांजली

### सावित्रीबाई फुले विद्यालयात जयंती उत्सव उत्साहात साजरा

■पातूर,दि ३ (प्रतिनिधी)■ 'विद्येविना मती गेली...' असा क्रांतीचा मंत्र देणाऱ्या आणि स्त्री शिक्षणाची कवाडे खुली करणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती सावित्रीबाई फुले प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात अत्यंत प्रेरणादायी वातावरणात आणि उत्साहात साजरी करण्यात आली.
यावेळी संपूर्ण परिसर 'ज्ञानज्योती'च्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या ॲडव्होकेट भारतीताई देशमुख यांनी आपल्या ओघवत्या भाषणात सावित्रीबाईच्या संघर्षाचा गौरव केला. त्या म्हणाल्या की, 'सावित्रीबाईनी अंगावर शेण-दगड सोसून शिक्षणाची जी पंढरी उभी केली, त्या त्यागामुळेच आज आपण या ठिकाणी भक्कमपणे उभे आहोत. त्यांनी मिळवून दिलेल्या अधिकारामुळेच आजची स्त्री ज्ञानाच्या शिखरावर पोहोचली आहे.' सावित्रीबाईचे विचार केवळ भाषणात न ठेवता ते



आचरणात आणण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.या सोहळ्याचे अध्यक्षस्थान कु.संस्कृती काळपांडे हिने भूषविले.
व्यासपीठावर संस्थेच्या अध्यक्षा सपनाताई म्हैसने, उपाध्यक्ष प्रांजलीताई कीर्तने, संचालिका माधुरीताई ढोणे, मुख्याध्यापक जे. डी. कंकाळ आणि ज्येष्ठ शिक्षक सुनील राखोंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाईच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.
साकारली 'सावित्रीची' रूपे या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे विद्यालयातील विद्यार्थिनींनी साकारलेली सावित्रीबाईची वेशभूषा. डोक्यावर पदर, कपाळावर ठसठशीत कुंकू आणि हातात पाटी-पेन्सिल घेतलेल्या चिमुकल्या 'सावित्री' पाहून उपस्थितांचे डोळे दिपले.

## काँग्रेसच्या आमदारांवर गंभीर आरोप,फलकाला फासले काळे

■अकोला,दि ३ (प्रतिनिधी)■
महापालिका निवडणुकीमध्ये अकोल्यात भाजपसोबतच काँग्रेसमध्ये देखील नाराजीनाट्य रंगले आहे. उमेदवारी का पल्यावरून माजी नगरसेवकाने आमदार साजिद खान पठाण यांच्यावर गंभीर आरोप केले. पैसे घेऊन तिकीट विकल्याचा आरोप माजी नगरसेवक मोहम्मद नौशाद शेख यांनी केला. संतप्त कार्यकर्त्यांनी आमदार साज झाली. काँग्रेस पक्षातील अंतर्गत नाराजी चव्हाट्यावर आली आहे. अकोला महापालिकेच्या २० प्रभागातील ८० जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याची मंगळवारी दुपारी ३ वाजेपर्यंत शेवटची मुदत होती.राजकीय पक्षांकडून अंतिम क्षणी उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आले. त्यानंतर भाजप व काँग्रेस पक्षामध्ये नाराजीचा स्फोट झाला. अंतर्गत प्रचंड खदखद आहे. स्लीम बहुल भागात काँग्रेस पक्षातही उमेदवारीसाठी प्रचंड स्पर्धा होती. माजी नगरसेवक मोहम्मद नौशाद शेख यांची उमेदवारी कापल्याने तीव्र रोष व्यक्त केला आहे. त्यांच्या समर्थकांमध्येही नाराजी पसरली. अकोला पश्चिमचे काँग्रेस आमदार साजिद खान पठाण यांच्या फलकावरील छायाचित्राला काळे फासण्यात आले. त्याची चित्रफित समाज माध्यमातून प्रसारित झाली.दरम्यान, एक चित्रफित समाज माध्यमा तून प्रसारित करीत मोहम्मद नौशाद शेख यांनी गंभीर स्वरूपाचे आरोप केले आहेत. त्यात ते म्हणाले, ''पंजा निशाणीवर उभ्या असलेल्या सर्व उमेदवारांना पाठा. त्यांनी सदैव मुस्लिमांचा विश्वासघात केला आहे. साजिद खान पठाण यांनी तिकीट कापले. प्रभागामध्ये २० कोटींचीटीं ची कामे केली आहेत. मात्र, साजिद खा न पठाण यांनी २० लाख रुपयात तिकीट विकले.'' काँग्रेसच्या माजी नगरसेवकाने थेट आमदारांवर गंभीर आरोप केल्याने खळबळ उडाली आहे युतीमध्ये अकोट फैल भागातील जागा राष्ट्रवादीला सोडण्यात आली. त्यामुळे भाजपकडून निवडणूक लढण्यासाठी इच्छूक असलेल्या शकुंतला जाधव व त्यांच्या समर्थकांनी माजी महापौर विजय अग्रवाल यांच्या निवासस्थानी चांगलाच गोंधळगों घातल्याचा प्रकार मंगळवारी दुपारी घडला.तिकीट न मिळाल्याने आक्रोश व्यक्त करीत इच्छूक महिलेच्या डोळ्यात अश्रू आले होते. यावेळी त्यांची प्रकृती बिघडून त्या खाली कोसळल्या. या प्रकारा मुळे चांगलीच खळबळ उडाली. त्यांनातत्काळ रुग्णालयात हलविण्यात आले.

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त जनजागृती रॅली व शासकीय योजनांचा कॅम्प

■अकोला,दि ३ (प्रतिनिधी)■
'ॲसेस टू जस्टीस' प्रकल्प व आय.एस.डब्ल्यू.एस. अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती, बालिका दिवस आणि स्त्री मुक्ती दिनानिमित्त कान्हेरी सरप येथे भव्य जनजागृती कार्यक्रम व नि:शुल्क शासकीय योजना शिबिराचे आयोजन करण्यात आले.मागील तीन वर्षांपासून 'बालविवाह मुक्त अकोला जिल्हा' करण्यासाठी ही संस्था कार्यरत आहे. केंद्रीय महिला व बालविकास मंत्री मा. अन्नपूर्णा देवी यांनी घोषित केलेल्या १०० दिवसीय अभियानाचा भाग म्हणून हा उपक्रम राबवण्यात आला. गीतांजली विद्यालय व ग्रामपंचायत कार्यालय येथून रॅलीची सुरुवात झाली. 'बेटी बचाओ-बेटी पढाओ' आणि 'बेटी मेरी अभी पढेंगी, विवाह की सूली नहीं चढेंगी' अशा घोषणांनी संपूर्ण गाव परिसर दुमदुमून गेला. रॅलीमध्ये ४०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कायदेविषयक मार्गदर्शन: रॅलीचा समारोप ग्रामपंचायत कार्यालयात झाला. यावेळी बालविवाह प्रतिबंधक कायदा, बाल तस्करी, बाल मजुरी आणि




बाल लैंगिक शोषण या विषयांवर तज्ज्ञांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थितांनी 'बालविवाह मुक्त भारत' करण्याची शपथ घेतली. तसेच बालकांच्या मदतीसाठी चाईल्ड लाईन १०९८ वर संपर्क करण्याचे आव्हान करण्यात आले. वंचित घटकांसाठी आयोजित या कॅम्पमध्ये पॅन कार्ड, ई-श्रम कार्ड, पीएम विश्वकम कार्ड, बांधकाम कामगार योजना, आभा कार्ड, आयुष्मान कार्ड आणि रेशन कार्ड यांसारखी महत्त्वाची कागदपत्रे नि:शुल्क काढून देण्यात आली.या कार्यक्रमाला बालकल्याण समितीच्या अध्यक्षा ॲड. अनिता गुरव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या मध्यस्थ ॲड. मीनल खंडारे, सरपंच सुनील ठाकरे व ग्रामपंचायत अधिकारी शिवदास गवई यांची प्रमुख उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा प्रकल्प सम न्वयक शंकर वाघमारे, पूजा पवार, पूजा मनवर, राजश्री कीर्तिवार, रवींद्र सावरकर, शैलेजा विखोरे, चाईल्ड लाईन समन्वयक हर्षाली गजभिये यांच्यासह अंगणवाडी सेविका,गीतांजली शाळेच्या शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## मूर्तिजापुरात ४ जानेवारीला तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा

■मुर्तिजापुर,दि ३ (प्रतिनिधी)■
भारत सरकारच्या क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयांतर्गत असलेल्या 'मेरा युवा भारत केंद्र, अकोला' आणि 'नेहरू युवा बहुउद्देशीय क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, कोकणवाडी' यांच्या संयुक्त विद्यमाने मूर्तिजापूर येथे ४ जानेवारी रोजी भव्य तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून तालुक्यातील तरुण-तरुणींना आपले क्रीडा कौशल्य दाखवण्याची आणि जिल्हा स्तरावर मजल मारण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. या स्पर्धेत १५ ते २९ वर्षे ( युवक व युवती) सहभागी होतील.या स्पर्धेत युवक आणि युवतींसाठी स्वतंत्र क्रीडा प्रकारांचे आयोजन करण्यात आले आहे. युवकांसाठी कबड्डी, गोळाफेक आणि १०० मीटर धावणे. युवतींसाठी खो-खो, गोळाफेक आणि १०० मीटर धावणे. तालुका स्तरावर प्रथम आणि द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडूंना जिल्हा स्तरीय स्पर्धेत खेळण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. प्रथम व द्वितीय क्रमांकः प्रमाणपत्र, मेडल आणि क्रीडा साहित्य. तृतीय क्रमांक: प्रमाणपत्र आणि मेडल, या स्पर्धेच्या निमित्ताने उपस्थित राहणाऱ्या मान्यवरांकडून खेळाडूंना मोलाचे मार्गदर्शनमि ळणार आहे. तालुक्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी या संधीचा लाभ घेऊन आपले व तालुक्याचे नाव लौकिक करावे, असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी महेश सिंह शेखावत यांनी केले.

## पत्रकार दिनी ६ जानेवारीला जनहिताचा परिसंवाद

**अकोला :** अकोला पत्रर्का समूहा तर्फे मतदार जागृती साठी पत्रकार दिन ६ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता प्रमिलाताई ओक हाल मध्ये मनपा निवडणुकीच्या पार्षवभूमी वर,नगर सेवक कसा असावा या विषयावर जनहिताचा परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे, राष्ट्रीय वृत्तपत्र संघटना इलना चे अध्यक्ष प्रकाश पोहरे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या परिसंवादात मा.सतीश फडके,डॉ संजय खडक्कार्,चंद्रकांत झटाले, डॉ रामाप्रकाश वर्मा ,डॉ गजानन नारे,प्रा मुकुंदरावं भारसाकले,डॉ जुबेर नदीम,निकेश गुप्ता , डॉ अर्चना पोटे -सपकालब , सौ सोनाली मोरे ,आदी विविध क्षेत्रातील व्यक्ती परिसंवादात सहभागी होणार आहेत ,पूर्ण पणे राजकारण विरहितब नॉन पोलिटिकल अशा या कार्यक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे अशी विनंती अकोला पत्रर्का समूहा ने केली.

## १२ जानेवारीला स्विकृत सदस्य तर १३ ला उपाध्यक्षाची निवड

▪तेल्हारा,दि ३ (प्रतिनिधी)▪

नगरपरिषदेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने १३ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवले असले, तरी सत्तेचा आकडा वाढवण्यासाठी व दोन स्विकृत सदस्य आपल्याकडेच राहावे या साठी अपक्ष नगरसेवकांवर डोळा ठेवत राजकीय हालचालींना वेग आला आहे. भाजपाच्या विरोधात निवडणूक लढणाऱ्या दोन नगरसेवकानी भाजपला पाठिंबा दिला की प्रवेश केला या बाबत अधिकृत घोषणा झाली नाही. परंतु एक अपक्ष एक नगर सेवा समितीचा नगरसेवक भाजपच्या गळ्याला लागल्याचे दिसून येत आहे. १३ जानेवारीला न. पा. उपाध्यक्षाची तर १२ जानेवारीला स्विकृत सदस्यांची निवड होणार आहे. निवडणुकीत ५ अपक्ष व वंचित बहुजन आघाडीचे २ नगरसेवक निवडून आले दोन स्विकृत सदस्य नेमण्यासाठी किमान १६ सदस्यांची आवश्यकता आहे. त्यामुळे अध्यक्षांसह तीन नगरसेवकांचा पाठिंबा मि ळवण्यासाठी भाजपकडून जोरदार प्रयत्न सुरू असल्याची चर्चा शहरात आहे. सध्या भाजपकडे नगराध्यक्षासह १४ नगरसेवकांचा आकडा असून, दोन स्वीकृत नगरसेवकांकरिता अपक्ष म्हणून निवडून आलेल्या नगरसेवकांपैकी एक नगरसेवक पूर्वी भाजपचा कार्यकर्ता असून, तो लवकरच पुन्हा अधिकृत प्रवेश घेणार असल्याची खात्रीलायक माहिती समोर येत आहे. याशिवाय उर्वरित नगरसेवा समितीचा एकमेव नगरसेवक अपक्षांपैकी हे दोन नगरसेवक भाजपला पाठिंबा देण्याच्या तयारीत असल्याची चर्चा राजकीय वतुळात रंगली आहे. नगराध्यक्षांसह २१ सदस्य संख्या असलेल्या तेल्हारा नगर परिषदेच्या उपाध्यक्षाची निवड १३ जानेवारीला होणार आहे त्याकरिता ५ जानेवारीला नामनिर्देशन पत्र स्विकारल्या जाणार आहेत. तसेच नामनिर्देशित सदस्यांची निवड १२ जानेवारीला करण्याकरिता ५ ते १२ जानेवारीपर्यंत नामनिर्देशित सदस्यांकरिता नामनिर्देशन पत्र दाखल करता येतील.

# महाबीज-७२७ संकरित ज्वारी वाणास राष्ट्रीय मान्यता

### महाराष्ट्रासह मध्यप्रदेशात खरीप लागवडीस शिफारस

▪अकोला,दि ३ (प्रतिनिधी)▪

महाबीज संशोधित संकरीत ज्वारी वाण महाबीज - ७२७ यास अखिल भारतीय समन्वयीत संशोधन चाचणी प्रयोगामध्ये सलग तीन वर्षे उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे राष्ट्रीय स्तरावर अधिसूचना प्राप्त झाली आहे. या उल्लेखनीय यशाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र व मध्यप्रदेश राज्यात खरीप हंगामासाठी या वाणाच्या लागवडीस अधिकृत शिफारस करण्यात आली आहे.



महाबीज - ७२७ हा वाण ११४ ते ११७ दिवसांत परिपक्व होणारा असून धान्याबरोबरच उच्च प्रतीच्या कडब्याच्या उत्पादनासाठी ओळखला जातो. अधिक उत्पादनक्षमता, उत्तम पोषणमूल्य आणि शेतकऱ्यांच्या दृष्टीने आर्थिकदृष्ट्याफायदेशीर ठरणारा हा वाण मर्यादित संसाधनांतही चांगले उत्पादन देणारा असल्याचे संशोधनातून सिद्ध झाले आहे. राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळालेल्या महाबीज - ७२७ वाणामुळे ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादनवाढीबरोबरच उत्पन्नातही लक्षणीय वाढ होण्याची आशा व्यक्त केली जात आहे. कडबा उत्पादनात धान्य शेतकऱ्यांसाठी लाभदायक वाण ठरेल असे मानले जात आहे.

मर्यादित मनुष्यबळ व साधनसामग्री असतानाही मिळवलेली ही राष्ट्रीय स्तरावरील उपलब्धी महाबीज महामंडळासाठी अभिमानास्पद असल्याचे प्रतिपादन महाबीजच्या व्यवस्थापकीयसंचालक श्रीमती बुवनेश्वरी यांनी केले. या यशाबद्दल त्यांनी संशोधन व विकास विभागाचे प्रमुख डॉ. प्रफुल्ल लहाने, उपमहाव्यवस्थापक गणेश डहाळे, जिल्हा व्यवस्थापक डॉ. निर्मल पारडे, ज्वारी पैदासकार संतोष देशमुख तसेच संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे विशेष कौतुक केले.

## भागवत म्हणजे शाश्वत सुखाचा मार्ग म्हणजे: सिताराम शास्त्री

### पु.राधे राधे महाराजांच्या चरण पादुका अभिषेक व पूजनास भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

▪अकोला,दि ३ (प्रतिनिधी)▪

आज आपण भौतिक सुखाची अपेक्षा धनाच्या माध्यमातून करतो. धनाच्या माध्यमातून सुख प्राप्त होते असा आपला समज असतो.मात्र हा समज तितका खरा नसून भागवत श्रवण व प्रभू भक्तीच्या माध्यमातूनच खऱ्या व शाश्वत सुखाची प्राप्ती होत असते. म्हणून भगवंत भक्ती करून शाश्वत सुख प्राप्त करण्याचा हितोपदेश शुकताल येथील कथा व्यास प. पु. सिताराम शास्त्री यांनी केला. श्रीमद भागवत सेवा समिती व संत श्री राधे राधे महाराज भक्त परिवारच्या वतीने संत श्री राधे राधे महाराज यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त न्यू राधाकिसन प्लॉट परिसरातील माहेश्वरी भवन येथे सुरू असलेल्या प. पु. सिताराम शास्त्री यांच्या भागवत कथेचे द्वितीय पुष्प सादर केले. या कथेत त्यांनी भागवतात विचारलेल्या सात प्रश्नांची उकल केली. मनुष्याच्या कल्याणाचा मार्ग कोणता? तर भक्ती हा कल्याणाचा मार्ग असून या भक्तीची कास धरून प्रभप्राप्तीचा मार्ग हा खरा मार्ग असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.ते म्हणाले, जीवनाचे अंतिम ध्येय आनंददायक परमात्म्याला प्राप्त करणे होय. तेच अंतिम स्थान आहे.

आम्ही जीवनरुपी वाहनात तर बसलो आहोत, मात्र आपणास कुठे जायचे हे माहीत नसल्यामुळे जीवन चक्रात चालत आहोत. सर्व शास्त्राचे सार काय? यावर विवेचन करताना ते म्हणाले, भगवंताची भक्ती हे सर्व शास्त्राचे सार आहे.ते सर्व पुराण वेदांचे सार आहे. तर भगवद्गीता ही सर्व पुराणवेदांचे सार असून या भगवद्गीतेचे सार म्हणजे भगवंतात आपले चित्त समाविष्ट करणे होय. हे गीतेचे सार असल्याचे त्यांनी सांगितले. भगवत गीतेत विचारण्यात आले की भगवंताच्या अवताराचे प्रयोजन काय? तर भक्तांचे कल्याण हेच भगवंताच्या अवताराचे मोठे कारण असून ते करतात काय? तर ते निर्माण, पालन व संहार हे तीन कार्य करीत असतात. त्यांचे अवतार किती आहेत त्यांचे अवतार अनंत आहेत. ते कसे असतात तर ते अनंत असून आकार- निराकारात विराजमान असतात. त्याचप्रमाणे धर्म कोठे निवास करीत असतो?तर धर्म हा भागवत मध्ये आहे आणि भागवतात धर्म निवास करतो.



त्याची व्याख्या भागवतात करण्यात आलेली आहे. संपूर्ण धर्म भागवतात आहे.भागवत हे अनादी आहे. वेदव्यासांनी त्यांची निर्मिती केली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. सत्राच्या उत्तरार्धात कथास्थळी पु राधे राधे महाराज यांच्या चरण पादुकांचा मुख्य यजमान प्रा. लक्ष्मीनारायण शर्मा,दैनिक यजमान प्रसाद कोनेर नागपूर, पाटील मॅडम पुणे यांनी अभिषेक करून पूजन केले.

## बुद्ध, फुले वसंत कबीर यांचा संगम म्हणजे बाबासाहेब

**अकोला :** गौतम बुद्ध, महात्मा फुले व संत कबीर यांच्या विचारांचा संगम म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. बाबासाहेबांचे कार्य माणुसकीची दिशा देणारे असून, जात, धर्म, पंथाच्या पलीकडे जाऊन माणूस म्हणून जगण्याची शिकवण देणारे आहे, असे विचार डॉ. प्रफुल्ल गवई यांनी मांडले.श्रीमती लरातो महाविद्यालयात ३० डिसेंबर २०१५ रोजी रिपब्लिकन विद्यार्थी फेडरेशन विद्यार्थी परिषद व विद्यार्थी मैत्री संघ यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विधिज्ञ व दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मोतीसिंह मोहता होते. प्रमुख वक्ते म्हणून सुप्रसिद्ध आंबेडकरी विचारवंत व साहित्यिक प्रा. डॉ. प्रफुल्ल गवई तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. पवन माहेश्वरी उपस्थित होते.

## जागरूक मतदारच लोकशाहीचा खरा रक्षक! : गजानन हरणे

### निर्भय बनो जनआंदोलन,राष्ट्रीय लोक आंदोलनातर्फे अकोला महानगरपालिका निवडणुकीत मतदार जनजागृती अभियान राबविण्याचा निर्धार

▪अकोला,दि ३ (प्रतिनिधी)▪

लोकशाही ही फक्त मतदान करण्याची प्रक्रिया नसून ती एक जिवंत प्रणाली आहे, जी सजग नागरिकांवर आधारित असते. समाजकार्यात अग्रस्थानी असलेल्या 'निर्भय बनो जन आंदोलन' राष्ट्रीय लोक आंदोलन आणि इतर सेवाभावी संस्थांच्या वतीने अकोला महानगरपालिका निवडणुकीत ५ जानेवारी ते १२ जानेवारी २०२६ दरम्यान व्यापक मतदार जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे. समाजसेवक गजानन हरणे संयोजक, निर्भय बनो जन आंदोलन, अकोला यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, भ्रष्टाचारी, गुंड, जातीयवादी आणि अपात्र उमेदवारांना रोखण्यासाठी मतदारांनी जागरूक राहून लोकशाहीचे पावित्र्य जपावे, हाच या अभियानाचा मुख्य हेतू आहे.

या अभियाना अंतर्गत शहरांतील नगरांम ध्ये जनजागृती पोहोचवण्यासाठी ज्येष्ठ रंगकर्मी अभिनेते रमेश थोरात यांच्या मार्गदर्शनात पथनाट्य सादरीकरण, कॉर्नर सभा, जनजागर रॅली, वार्डसभा व पोस्टर पत्रक वितरण आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व माध्यमांतून मतदारांना सुजाण,



चारित्र्यसंपन्न, पारदर्शक आणि लोकहितवादी उमेदवारालाच निवडून देण्याचे आवाहन करण्यात येणार आहे.

नगरातील मंदिर, मज्जित आदी धार्मिक स्थळासाठी उमेदवाराकडून देणगी घेऊन एकमुखाने मतदान करणे हा व्यवहार जसा चुकीचा आहे, तसाच केवळ जाती, धर्म, प्रलोभन वा पक्षनिष्ठतेच्या आधारावर मत देणे हेही लोकशाहीसाठी घातक आहे, असा स्पष्ट संदेश या अभियानातून दिला जाणार आहे. कॉलनीच्या धार्मिक स्थळांचे पावित्र्य राखण्यासाठी काळा पैसा स्वीकारणे योग्य नाही, आणि राष्ट्र रूपी मंदिरात अशा अपात्र उमेदवारांना पाठवणे ही लोकशाहीविरोधी कृती आहे, हे मतदारांना समजावून सांगण्यात येणार आहे.गजानन हरणे पुढे म्हणाले की, आपण भाजीपाला खरेदी करताना देखील चौकशी करतो, दर्जा पाहतो, किंमत विचारतो; मग संपूर्ण प्रभागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या उमेदवार निवडताना अधिक जागरूकता का नको? हीच जाणीव सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. तसेच योग्य उमेदवार नसल्यास 'नकारात्मक मतदान' (छजढअ) हा पर्यायही लोकशाहीने दिलेला आहे, याची जाणीव करून देण्यात येणार आहे.

या अभियानात सामाजिक संस्था, युवक संघटना, महिला मंडळे, स्वयंसेवी कार्यकर्ते, बचत गट आणि नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन 'निर्भय बनो जन आंदोलन'तर्फे करण्यात आले आहे.कारण जागृत मतदारच देशाचे भविष्य घडवतो आणि निष्काळजी मतदार देशाचे भवितव्य गमावतो. यासाठी सर्वांनी अभियानात सहभागी होऊन तन-मन-धनाने सहकार्य करावे अशी विनंती समाजसेवक गजानन हरणे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे

## जठारपेठ येथील वाचनालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिर संपन्न



▪अकोला,दि ३ (प्रतिनिधी)▪

पोलीस भरती परीक्षा येत्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. याचबरोबर महाराष्ट्र लोकसेवा आयोग तथा इतर स्पर्धा परीक्षा होऊ घातल्या आहेत. या सर्व परीक्षांना कसे सामोरे जावे व अभ्यास कसा करावा याचे मार्गदर्शन शिबिर 'जठारपेठ परीसरातील अरुण दिवेकर सार्वजनिक वाचनालय' येथे आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष निखीलेश दिवेकर यांनी केले. या कार्यक्रमात ज्ञानज्योत अकॅडमीचे संचालक प्रा निखील पातोंड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत अश्या स्पर्धा परीक्षांना कसे सामोरे जावे याचे तांत्रिक मार्गदर्शन केले. याप्रसंगी वाचनालयाचे सचिव प्रशांत कौसल,खजिनदार महादेव मेहेंगे आदी उपस्थित होते.

## पोलीस उदय दिनी अकोट ग्रामीण पोलिसांचं रक्तदान शिबिर

▪अकोट,दि ३ (प्रतिनिधी)▪

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या संकल्पनेतून पोलीस उदय दिनानिमित्त अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनतर्फे विविध समाजाभिमुख उपक्रम राबविण्यात आले. ०२ जानेवारी २०२६ रोजी सेंट पॉल स्कूल, तांदुळवाडी फाटा (अकोट) व हुसने दलवाई उर्दू विद्यालय, पणज येथील विद्यार्थ्यांनी पोलीस स्टेशनला भेट दिली. पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे, पोउपनि मिनाक्षी काटोले यांनी पोलीस कामकाज, कायदा-सुव्यवस्था, गुप्त विभाग, मुद्देमाल कक्ष व शस्त्रांविषयी माहिती दिली. याच दिवशी आयोजित रक्तदान शिबिरात ३२ जणांनी रक्तदान केले.३ जानेवारी २०२६ रोजी लोकमान्य टिळक विद्यालय, उमरा येथे सायबर गुन्हे व व्यसनमुक्तीवर पथनाट्य सादर करून रॅलीद्वारे जनजागृती करण्यात आली. हे उपक्रम मा. अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत बी. रेड्डी व सहा. पोलीस अधीक्षक निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले.



यामध्ये पो.हे.कॉ. उमेशचंद्र सोळंके, मोहम्मद नौरंगाबादी, योगेश जउळकार, शिवकुमार तोमर, मपोहेकॉ गीता भांगे, उमा आसरे, पोकॉ सचिन कुलट, नंदकिशोर नेमाडे, राजेश माळेकर आदी कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

## रोटरी ॲग्रोसिटीची गर्भाशय कर्करोग व लसीकरण जागृती सभा संपन्न



▪अकोला,दि ३ (प्रतिनिधी)▪

मांगीलाला शर्मा विद्यालय, वानखडे नगर येथील आर्थिक दृष्ट्या मागास व वर्ष ९ ते १६ ह्या वयोगटातील विद्यार्थीनी व त्यांच्या पालकांकरिता जागृती सभा रोटरी ॲग्रोसिटीच्या वतीने व सिरम इन्स्टिट्यूट च्या सहकार्याने संपन्न झाली.रोटरी क्लब ऑफ अकोला एग्रोसिटीचे अध्यक्ष शशांक जोशी यांच्या पुढाकारात संपन्न या जागृती सभेस स्त्रीरोग तज्ञ डॉ यशश्री देशमुख ह्यांचे मार्गदर्शन लाभले.तसेच सिरम इन्स्टिट्यूटचे प्रतिनिधी विक्रांत कुलकर्णी व भूषण पिंपळगावकर ह्याचे ही मोलाचे सहकार्य लाभले.रोटरी ॲग्रोसिटीचे अमित कोल्हटकर ह्यांनी प्रोजेक्टर उपलब्ध करून दिले. शाळेच्या शिक्षिका ज्योती रानडे व कर्मचारी वृंदांनी परिश्रम घेतले. ह्या सभेमध्ये एकूण १३० पालक उपस्थित होते.यावेळी रोटरी एग्रोसिटीचे अध्यक्ष शशांक जोशी, सचिव संगीता चौधरी ह्यांनी डॉ यशश्री देशमुख ह्यांना सन्मान चिन्ह प्रदान केले. कार्यकमास संपदा जोशी, नीता दिंडोकर,अतुल चौधरी, प्रीती व किरण ढवळे,सुनीता व गुणवंत देशपांडे,दीपा व सोमेश्वर रत्नपारखी,अर्चना व संतोष पाटील, रविंद्र शिंदे उपस्थित होते.

### थंडी वाढण्याची शक्यता

अकोला: अकोल्याचे किमान तापमान शुक्रवारी १५.१ अंश सेल्सिअस, तर कमाल तापमान ३२.२ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले. दरम्यान, अमरावती विभागासाठी सध्या थंडीच्या लाटेचा कोणताही इशारा जारी करण्यात आलेला नाही. तथापि, प्रादेशिक हवामान केंद्राच्या अंदाजानुसार ४ जानेवारीपासून तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसने घट होण्याची शक्यता वर्तविली आहे.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name
----OLD NAME---
FAYUMKHA KAYUMKHA
----NEW NAME----
FAHIM KHAN KAYUM KHAN
My Residential Address is :- Deshpande Plot Near Asad Jamdar House Washim Road Old City Akola Maharashtra 444002

## विवेकानंद हायस्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

▪अकोला,दि ३ (प्रतिनिधी)▪

नामांकित शाळांमध्ये गणल्या जाणाऱ्या व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात सदैव अग्रेसर असणाऱ्या स्थानिक तापडिया नगर स्थित विवेकानंद इंग्लिश हायस्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. सर्वप्रथम शाळेतील विद्यार्थ्यांनी मानवंदना देऊन शिस्तबद्ध पद्धतीने ''स्लो मार्च' करत सर्व मान्यवरांना मंचावर नेले.



कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून शार्दुल दिगंबर,संस्थेचे अध्यक्ष अनिल पिंपरखेडे,ज्येष्ठ उपाध्यक्ष,नरेंद्र पाठक, सचिव रवींद्र अभ्यंकर, सदस्य प्रशांत ठोकळ, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. संगीता कोकीळ हे मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या माता सरस्वती व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सुमधुर असे शारदास्तवन सादर केले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत अध्यक्षांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश प्राप्त केलेल्या वर्ग ५ वी चा धनुष घाटोळ, स्वरा लव्हाळे, अवनी चव्हाण, पूर्वी गावंडे व वर्ग ८ वी चा चैतन्य बाभुळकर, ईश्वरी सपकाळ, आयुष इंगळे या विद्यार्थ्यांचा ट्रॉफी व रोख बक्षीस देऊन गौरव करण्यात आला.

तसेच क्रिकेट,आर्चरी, फेन्सिंग, अशा विविध खेळांमध्ये विभागीय स्तरावर झळकलेल्या विद्यार्थ्यांचे मेडल्स व स्पोर्ट किट देऊन याप्रसंगी कौतुक करण्यात आले. शाळेचे क्रीडा शिक्षक अतुल पवरे यांच्या मार्गदर्शनात कराटे या खेळात राज्यस्तरावर चमकलेल्या तनवी मोहोड हिचे ब्लेझर,स्पोर्ट किट देऊन याप्रसंगी कौतुक करण्यात आले. राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त जि. प. अकोला व कुतूहल संस्कार केंद्र तर्फे घेण्यात आलेल्या सायन्स पोस्टर स्पर्धेत उत्तरा आवारे हिचा विभागीय स्तरावर तृतीय क्रमांक आला.

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**e-TENDER NOTICE – 109 / 2025–26**

Following e-Tender offers are invited online from registered contractors / companies etc. are available at our website https://eprocurement.mahagenco.in.

| e-Tender No. | RFX No. | Particulars of Work / Supply | Estt. Cost Rs. (In Lakhs) |
|---|---|---|---|
| TN0785 EM1 | 3000064138 | WORK OF CLEANING OF GTR OIL COOLERS OF U#01 TO 04 AT 210 MW TPS KHAPERKHEDA ON AS AND WHEN REQUIRED BASIS. | 6.30 |
| TN0793 CHP1 | 3000064213 | WORK OF RAW COAL LOADING & TRANSPORTATION BY ROAD MODE FROM SILLEWADA MINE / CHP OF WCL TO KHAPERKHEDA TPS. | 39.79 |
| TN0794 CHP1 Refloated | 3000064197 | WORK OF REPAIRING / OVERHAULING OF BULLDOZER ENGINE AS & WHEN REQUIRED BASIS AT TPS KHAPERKHEDA | 50.73 |
| TN0795 OS2 Refloated | 3000064254 | BIENNIAL WORK CONTRACT FOR HOUSEKEEPING AND ALLIED WORKS AT BOILER SIDE AT UNIT- 5, 500 MW, KHAPERKHEDA TPS. | 190.45 |

Note » Tender cost is Rs. 1,000 /- + GST.

Sd /-
Chief Engineer (O&M)
MSPGCL, TPS Khaperkheda

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak. Local Editor Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८६ महासागर अकोला मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, मिला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)

# दत्ता मेघे मेडिकल कॉलेजच्या आर्ट क्लबने केले उत्साहतेने नवीन वर्षाचे स्वागत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

दत्ता मेघे मेडिकल कॉलेजच्या आर्ट क्लबमधील दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षाच्या एमबीबीएस विद्यार्थ्यांनी 31 डिसेंबर 2025 रोजी 2026 या नवीन वर्षाचे आनंदाने स्वागत केले. या कार्यक्रमात सर्जनशीलता, विद्यार्थी सहभाग आणि मानसिक आरोग्य यावर भर दिला गेला. विद्यार्थ्यांनी हाताने सजावट केली आणि खास सेल्फी पॉइंट तयार केला, ज्यामुळे कॅम्पसवर आनंदी आणि उत्साही वातावरण निर्माण झाले.




या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये एकता, स्वतःची मते व्यक्त करणे आणि मानसिक आरोग्य सुधारणे हा होता. उत्सवाचा भाग म्हणून 1 जानेवारी 2026 रोजी विद्यार्थी आणि प्राध्यापकांचे पिवळ्या रंगाचे कपडे घालून ग्रुप फोटो घेण्यात आले, जे सकारात्मकता, आनंद आणि एकतेचे प्रतीक होते.

कार्यक्रमात डॉ. अनुप मरार, डायरेक्टर ऑफ-कॅम्पस, डीएमआयएचईआर; डॉ. उज्वल गजबे, डीन, दत्ता मेघे मेडिकल कॉलेज; डॉ. बी. आर. सिंग, व्हाइस डीन, दत्ता मेघे मेडिकल कॉलेज; आणि डॉ. वसंत गावंडे, सीएमएस, एसएमएचआरसी हजर होते. या मान्यवरांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले आणि शैक्षणिक यशासोबत मानसिक आरोग्याचे महत्त्व सांगितले.

उत्सवाच्या आनंदात भर घालण्यासाठी मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी या प्रसंगी एक संगीत बँडदेखील सुरू केले, ज्याद्वारे त्यांनी अकादमिक अभ्यासाबाहेरील आपली प्रतिभा दाखवली आणि सर्वांगीण विकासाचा संदेश दिला.

या उत्सवातून संस्थेने भविष्यकालीन आरोग्यसेवा व्यावसायिकांमध्ये सर्जनशीलता, मैत्री आणि भावनिक आरोग्य वाढवण्याची आपली बांधिलकी दाखवली.

## भारतीय फलंदाज साई सुदर्शनच्या बरगडीला फ्रॅक्चर

■ वृत्तसंस्था,
नवी दिल्ली, दि. ३ :




भारतीय क्रिकेट संघाचा युवा फलंदाज साई सुदर्शन विजय हजारे ट्रॉफीमध्ये मध्य प्रदेशविरुद्धच्या सामन्यात जखमी झाला आहे. त्याच्या बरगडीला फ्रॅक्चर झाले आहे. 24 वर्षीय सुदर्शनला तामिळनाडूसाठी उर्वरित सामन्यांमध्ये खेळणे कठीण आहे. तथापि, तो इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मध्ये गुजरात टायटन्ससाठी उपलब्ध असण्याची शक्यता आहे.

साई सुदर्शनने शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना दक्षिण आफ्रिकेविरुद्ध गुवाहाटी येथे 22 ते 26 नोव्हेंबर 2024 रोजी खेळला होता. तो व्हाईट बॉल मालिकेचा भाग नव्हता. साई सुदर्शनने शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना दक्षिण आफ्रिकेविरुद्ध गुवाहाटी येथे 22 ते 26 नोव्हेंबर 2024 रोजी खेळला होता. तो व्हाईट बॉल मालिकेचा भाग नव्हता. बीसीसीआयच्या एका सूत्राने सांगितले की, अहमदाबादमध्ये तामिळनाडू आणि मध्य प्रदेश यांच्यात खेळल्या गेलेल्या विजय हजारे ट्रॉफी सामन्यात धाव पूर्ण करताना डायव्ह मारल्यामुळे त्यांच्या उजव्या बाजूच्या सातव्या बरगडीला (अँटेरिअर कॉर्टेक्स) फ्रॅक्चर झाले होते. सुदर्शनला एका महिन्यापेक्षा जास्त काळ मैदानाबाहेर राहावे लागू शकते. सध्या, सुदर्शन भारतीय क्रिकेट संघाचा भाग नाही. सुदर्शनच्या बरगडीला यापूर्वीही दुखापत झाली होती दुखापत झाल्यानंतर सुदर्शनने 29 डिसेंबर रोजी बेंगळुरू येथील सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये अहवाल दिला होता.

# पती महिलेसोबत इस्त्रायलमध्ये मृतावस्थेत सापडला

## पत्नीने केरळमध्ये जीवन संपवले



■ वृत्तसंस्था, वायनाड, दि. ३ :

इस्त्रायलमध्ये संशयास्पद परिस्थितीत पतीच्या मृत्यूनंतर पाच महिन्यांनी, केरळमधील एका महिलेने आत्महत्या केली आहे. वायनाडमधील कोलायाडी गावातील रहिवासी रेश्मा (३२) हिने बुधवारी विष प्राशन करून आत्महत्या केली. रेश्माचा पती जिनेशचा इस्त्रायलमध्ये संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाला होता, परंतु अधिक माहिती जाहीर झालेली नाही. कुटुंबीयांच्या मते, रेश्मा आणि जिनेश यांना दहा वर्षांची मुलगी आहे.

वृत्तानुसार, जिनेश मे महिन्यात इस्त्रायलला गेला होता. तो वृद्धांची काळजी घेणाऱ्या कंपनीत काम करत होता. कंपनीने त्याला एका ८० वर्षीय महिलेची आणि तिच्या आजारी पतीची काळजी घेण्यासाठी नियुक्त केले होते. तथापि, या वर्षी जुलैमध्ये, हॉटेलच्या खोलीत महिलेचा आणि जिनेशचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाला. जिनेशचा मृतदेह अपार्टमेंटमध्ये लटकलेल्या अवस्थेत आढळला, तर महिलेचा मृतदेह चाकूने घाव घालून आढळला.

रेश्माच्या मृत्यूनंतर, लोकांनी इस्त्रायलमध्ये काम करणाऱ्या एका केरळवासीयाला जिनेशच्या केसबद्दल माहिती विचारली. त्यांनी सांगितले की या केसबद्दल अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. दोघांचा मृत्यू कसा झाला याचे गूढ कायम आहे. त्यांनी सांगितले, "आम्ही इस्त्रायलमधील भारतीय दूतावासाशी अनेक वेळा संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, परंतु खटला न्यायालयात प्रलंबित असल्याचे सांगण्यात आले."

रेश्माच्या मृत्यूनंतर, कोलायाडीच्या माजी पंचायत सदस्या सुजा जेम्स यांनी तिच्या प्रकृतीचे वर्णन केले. त्या म्हणाल्या, "पतीच्या मृत्यूनंतर रेश्मा खूप दुःखी होती. शिवाय, जिनेशवर महिलेच्या हत्येचा आरोप होता, ज्यामुळे ती आणखी दुःखी झाली. तिचा नवरा असे पाऊल उचलेल असे तिला कधीच वाटले नव्हते. तिने या प्रकरणाबाबत अधिकाऱ्यांना अनेक ईमेल पाठवले होते, परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही."

## भारत-न्यूझीलंड पहिल्या वनडेचे तिकीट ५ मिनिटांत विकले

■ वृत्तसंस्था, इंदूर, दि. ३ :

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील एकदिवसीय मालिकेतील पहिल्या सामन्याबद्दल प्रचंड उत्साह दिसून आला. इंदूरच्या होळकर स्टेडियमवर 18 जानेवारी रोजी होणाऱ्या या सामन्याची तिकिटे अवघ्या 5 मिनिटांत विकली गेली. शनिवारी सकाळी लोक झोपेतून जागे होण्यापूर्वीच तिकिटे विकली गेली होती. शनिवारी सकाळी बरोबर 5 वाजता तिकिटांची ऑनलाइन विक्री सुरू झाली होती.

झोमॅटोच्या डिस्ट्रिक्ट या तिकीट बुकिंग प्लॅटफॉर्मवर विंडो उघडताच चाहते तिकिटे खरेदी करण्यासाठी तुटून पडले. स. 5:15 वाजण्यापूर्वीच सर्व तिकिटे बुक झाली.

## टी-२० विश्वचषकासाठी दक्षिण आफ्रिकेचा संघ जाहीर

■ वृत्तसंस्था, क्रीडा डेस्क, दि. ३ :

क्रिकेट दक्षिण आफ्रिकेने टी-20 विश्वचषकासाठी 15 सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. शुक्रवारी जाहीर झालेल्या या संघाचा कर्णधार एडन मार्करम याला बनवण्यात आले आहे. या संघात कॉर्बिन बॉश, डेवाल्ड ब्रेविस, टोनी डी जॉर्जी, डोनोवन फरेरा, जॉर्ज लिंडे, क्वेना मफाका आणि जेसन स्मिथ यांसारखी नावे आहेत, जे पहिल्यांदाच टी20 विश्वचषकासाठी निवडले गेले आहेत. तर, बरगडीच्या दुखापतीनंतर वेगवान गोलंदाज कागिसो रबाडा टी20 आंतरराष्ट्रीय संघात पुनरागमन करत आहे.

## अदाणी एंटरप्रायझेसने १,००० कोटी रुपयांचा तिसरा सार्वजनिक एनसीडी इश्यू जारी केला

■ वृत्तसंस्था,अहमदाबाद, दि. ३ :

१९९३ पासून शाश्वत पायाभूत सुविधा व्यवसाय उभारण्याचा दीर्घ अनुभव असलेली, अदाणी समूहाची प्रमुख कंपनी आणि बाजार भांडवलाच्या बाबतीत भारतातील सर्वात मोठी सूचीबद्ध व्यवसाय इन्क्यूबेटर, अदाणी एंटरप्रायझेस लिमिटेड ("कंपनी" किंवा "एईएल"), ने सुरक्षित, मानांकित, सूचीबद्ध रिडीमेबल, नॉन-कन्व्हर्टेबल डिबेंचर्सचा तिसरा सार्वजनिक इश्यू लॉंच करण्याची घोषणा केली आहे.

## स्कोडा ऑटोच्या २५ व्या वर्धापनदिनी ७२,६६५ कार विकल्या

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :



### वार्षिक १०७ टक्के नोंदवली वाढ

स्कोडा ऑटोने आतापर्यंतच्या भारतातील प्रवासात २०२५ हे आपले सर्वात निर्णायक वर्ष म्हणून ठरवले. त्यांनी देशात त्यांच्या आतापर्यंतच्या सर्वात मजबूत विक्री कामगिरीसह आपला २५ वा वर्धापनदिन साजरा केला. या ब्रँडने २०२५ मध्ये ७२,६६५ कारांची विक्री करून वर्ष समाप्त केले, जे २०२४ मध्ये विकलेल्या ३५,१६६ युनिट्सच्या तुलनेत १०७ टक्के वार्षिक वाढ दर्शवते. या असाधारण कामगिरीमुळे २०२५ हे स्कोडा ऑटो इंडियाचे आतापर्यंतचे सर्वात मोठे वर्ष ठरले आहे, जे उत्पादने, बाजारपेठा आणि ग्राहक संपर्कबिंदूंमध्ये वाढलेल्या गतीचे प्रतिबिंब दर्शवते.

या ऐतिहासिक वर्षाबद्दल टिप्पणी करताना, स्कोडा ऑटो इंडिया चे ब्रँड डायरेक्टर आशिष गुप्ता म्हणाले, २०२५ हे वर्ष आमच्यासाठी नेहमीच खास राहील. हे भारतातील आमच्या २५ व्या वर्धापनदिनाचे प्रतीक आहे, आणि या काळात आम्ही आमच्या इतिहासातील सर्वात सुधारित आणि वैविध्यपूर्ण उत्पादन पोर्टफोलिओसह पुढे आलो आहोत, तसेच नेटवर्क आणि बाजार उपस्थितीच्या बाबतीत आम्ही आता सर्वात व्यापक आहोत. हे सर्व, आमच्या ग्राहकांनी आम्हाला दाखविलेल्या विश्वास आणि प्रेमासह, आम्हाला भारतात आमच्या इतिहासातील सर्वात मोठ्या वर्षात पोहोचवले आहे. कायलॅक साठी मिळालेली प्रचंड प्रतिसाद, कोडियक, साठी सतत मिळणारी प्रशंसा आणि ऑक्टाव्हिया आर.एस च्या परतीसाठीचे उत्कट उत्साह हे ग्राहकांमधील ब्रँडशी असलेल्या मजबूत भावनिक नात्याची पुन्हा पुष्टी करतात. यासोबतच, आमच्या इंडिया २.० प्रवासाची सुरुवात करणाऱ्या कुशक आणि स्लाव्हिया या कार्सना सातत्यपूर्ण मागणी मिळत आहे. २०२६ मध्ये प्रवेश करताना, आम्ही या गतीला नव्या उत्पादनांच्या आक्रमक मोहिमेसह, अधिक प्रभावी विक्री आणि विक्रीनंतरच्या उपक्रमांसह पुढे नेण्याची, तसेच आमची पोहोच वाढवून ग्राहकांच्या अधिक जवळ येण्याची अपेक्षा करतो.

कोडियक,ने प्रीमियम एसयूव्ही क्षेत्रात स्कोडाची उपस्थिती अधिक दृढ केली, आणि ऑक्टाव्हिया आर.एस च्या परतीने ब्रँडच्या कामगिरीच्या वारशाला पुन्हा नवजीवन दिले.

## सरकारी बसची ऑटोला मागून धडक चालक जागीच ठार

■ वृत्तसंस्था, भुवनेश्वर, दि. ३ :



ओडिशातील भुवनेश्वर येथे एका मुख्य रस्त्यावर एका सरकारी बसने एका ऑटोरिक्षाला मागून धडक दिली. ऑटोरिक्षाचा चालक जागीच ठार झाला. ही घटना शनिवारी दुपारी शहरातील वर्दळीच्या रूपाली चौकात घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, रूपाली चौकात ट्रॅफिक सिग्नलवर अनेक वाहने थांबली होती. ऑटोरिक्षा एका स्कूल बसच्या मागे उभी होती. मागून येणाऱ्या एका वेगाने येणाऱ्या बसने नियंत्रण गमावले आणि ऑटोरिक्षाला धडक दिली.

धडक इतकी जोरदार होती की ऑटोरिक्षा पूर्णपणे चुराडा झाली. ऑटोरिक्षा इतकी जोरदार धडकली की ती समोर उभ्या असलेल्या स्कूल बसलाही धडकली. ऑटोरिक्षा ढिगाऱ्यात ढासळली. ऑटोरिक्षा चालक गंभीर जखमी झाला आणि जागीच त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात गोंधळ उडाला. घटनास्थळी उपस्थित असलेल्या लोकांनी अपघातासाठी थेट सरकारी बसचालकाला जबाबदार धरले. अपघातानंतर बसचालक आणि कंडक्टर घटनास्थळावरून पळून गेले.

अपघातानंतर मोठ्या संख्येने स्थानिक लोक घटनास्थळी जमले. सरकारी बसेसच्या वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे संताप व्यक्त होत होता. परिसरात काही काळ तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती.

माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी घटनास्थळाला घेराव घातला आणि गर्दी नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला. मृतदेह बाहेर काढण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहने वळवण्यात आली. पोलिस फरार चालक आणि वाहकाचा शोध घेत आहेत.

# जुनी परंपरा आणि तिळ-गुळ खाण्यामागील आरोग्यशास्त्र

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :



चीफ डायटिशियन स्वाती अवस्थी यांचे मार्गदर्शन

भारतामध्ये मकर संक्रांत हा सण साजरा करण्याची तयारी सुरू झाली की घराघरात तिळ आणि गुळाचा सुगंध दरवळू लागतो. शतकानुशतके चालत आलेली तिळ-गुळ खाण्याची ही जुनी परंपरा केवळ सांस्कृतिक प्रथा नसून आपल्या आहार आणि आरोग्याबद्दलच्या जाणिवेचे उत्तम उदाहरण आहे. वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूरच्या मते, सण हे केवळ आनंद साजरा करण्याची संधी नाही, तर आपल्या आरोग्याची काळजी घेण्याची संधी देखील आहे. मकर संक्रांतीला सूर्य मकर राशीत प्रवेश करतो. यामुळे दिवस मोठे होऊ लागतात, शरीरात नवी ऊर्जा येते आणि हळूहळू थंडी कमी होऊ लागते. परंपरेनुसार, या ऋतूबदलाच्या काळात शरीर गरम ठेवणारे, रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे आणि एकूण आरोग्यास पूरक असे अन्न खाणे योग्य मानले जाते. तिळ आणि गुळ यांचे पारंपरिक मिश्रण यासाठी अतिशय उपयुक्त आहे.

वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर येथील चीफ डायटिशियन स्वाती अवस्थी सांगतात की, तिळ हे नैसर्गिकरित्या उष्णता निर्माण करतात आणि त्यामध्ये चांगले फॅट्स असतात. त्यामुळे शरीर उबदार राहते, सांध्यांचे आरोग्य सुधारते आणि थंडीत ऊर्जा टिकून राहते. गुळामध्ये लोह, झिंक आणि मॅग्नेशियमसारखी महत्त्वाची खनिजे असतात, जी रोगप्रतिकारशक्ती वाढवतात आणि हंगामी आजारांचा धोका कमी करतात.

रोगप्रतिकारशक्तीव्यतिरिक्त तिळ-गुळ त्वचा आणि केसांसाठीही खूप फायदेशीर आहे. तिळातील पोषक घटक आणि अँटीऑक्सिडंट्स त्वचेला आतून पोषण देतात आणि हिवाळ्यात होणारा कोरडेपणा आणि निस्तेजपणा कमी करतात. गुळ रक्त शुद्ध करण्यास मदत करतो, ज्यामुळे त्वचेवर नैसर्गिक तेज येते आणि त्वचा निरोगी राहते.

## चार वर्षांच्या चिमुकलीवर बलात्कार

■ वृत्तसंस्था, उत्तर प्रदेश, दि. ३ :

जिल्ह्यातील सिकंदराबाद परिसरात एका चार वर्षांच्या बालिकेसह बलात्कार करून हत्या करण्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. घोडगाटी परिस्थितीत, पोलिसांनी तिपासून तीन तासांच्या आतच या कृत्याच्या आरोपींना एनकाउंटरदरम्यान ताब्यात घेतले.

घटनास्थळाची माहिती अशी की, बालिका संध्याकाळी घराबाहेर गेलेली होती आणि तिचा काही वेळाने सापडला नाही. तिच्या शोधाबरोबरच तिचे शव मकानाच्या मागील भागातून आढळ्ले. पोलिसांनी त्वरित तपास सुरू केला आणि बालिकेच्या पित्याने सिकंदराबाद पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. तक्रारीत म्हटले होते की, आरोपी त्याच्या घरात भाड्याने राहणारे दोन तरुण आहेत.

सखोल तपासानंतर पोलिसांना संशयित आरोपी राजू आणि वीरा कश्यप, जे अनुक्रमे लखीमपूर आणि बलरामपूर येथील रहिवासी आहेत, एका बांधकामाधीन कॉलनीत लपलेले असल्याचे समजले. आरोपींनी पोलिसांना गनिंग करून विरोध केला, पण पोलीसांनी तात्काळ प्रत्युत्तर दिले. त्यानंतर दोघांनाही पायात गोल्या लागल्या आणि त्यांना ताब्यात घेण्यात आले.

## आजचे राशीभविष्य

**मेष :** एखाद्या महत्त्वाच्या कामात तुम्हाला मित्रांकडून मदत मिळण्याची शक्यता आहे. नातेवाईक वारंवार भेट देत राहतील. आज तुम्ही धार्मिक तीर्थयात्रेची योजना आखू शकता. कामात एकाग्रता वाढवण्यासाठी मेडिटेशन करा.

**वृषभ :** आज, तुम्हाला तुमच्या ओळखीच्या एखाद्या व्यक्तीकडून उत्पन्नाचे नवीन स्रोत सापडतील. मागील मतभेद विसरून तुमच्या कुटुंबासोबत चांगला वेळ घालवाल. आज वकिलाकडून कायदेशीर सल्ला घेणे तुमच्यासाठी योग्य ठरेल.

**मिथुन :** आजचा दिवस खूप चांगला जाईल. त्यांना एखाद्या विशिष्ट परीक्षेत यशस्वी निकाल मिळण्याची शक्यता आहे. पण या यशाने अतिआत्मविश्वास बाळगू नका; त्यापासून प्रेरणा घेऊन आणखी कठोर परिश्रम करा. हवा डोक्यात जाऊ देऊ नका.

**कर्क :** आज तुम्हाला चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे. तुम्ही कुटुंबातील सदस्यांसोबत चांगला वेळ घालवाल, ज्यामुळे तुमचे नाते आणखी सुधारेल. तुम्ही तुमच्या मुलांसोबत बाहेर खेळ खेळण्यासाठी देखील जाऊ शकता. विनाकारण राग ठेवणाऱ्या लोकांमुळे डोक्याचा ताप वाढणार, दुर्लक्ष करा.

**सिंह :** आज तुम्हाला जवळच्या मित्रांसोबत आणि कुटुंबासोबत आरामात, आनंदात वेळ घालवण्याची संधी मिळेल. जर तुम्ही आज महत्वाची कामे आखली आणि अंमलात आणली तर तुम्ही नक्कीच यशस्वी व्हाल.

**कन्या :** तुमच्या नोकरीशी संबंधित चांगली बातमी तुम्हाला मिळू शकते, ज्यामुळे तुमची आर्थिक परिस्थिती सुधारेल. तुम्ही काही नवीन लोकांना भेटू शकता, ज्यामुळे अनपेक्षित आर्थिक फायदा होऊ शकतो. आळस झटका आणि राहिलेलं काम पूर्ण करा.

**तूळ :** आज, तुमच्या विनोदी स्वभावामुळे मित्र-मैत्रिणी वाढतील. तुमची लोकप्रियता वाढेल. तुमची चांगली प्रगती होईल. आज आर्थिक प्रगतीचे नवे मार्ग सापडतील.

**वृश्चिक :** आज, सहकाऱ्यांच्या मदतीने, तुम्ही एखादा प्रकल्प वेळेपूर्वी पूर्ण कराल. या राशीच्या ज्या व्यक्ती संगीतक्षेत्रात त्यांचा दिवस उत्तम जाईल, नवी संधी मिळेल. घरात कुरबुरी होऊ शकतात, वाद वाढू देऊ नका.


**धनु :** आज तुम्हाला ऑफिसमध्ये सतर्क राहावे लागेल, अन्यथा दुसऱ्याच्या चुकीमुळे तुम्हाला अडचणी येऊ शकतात, म्हणून तुमचे काम पूर्ण करण्यासाठी इतरांवर अवलंबून राहू नका, स्वतःवर विश्वास ठेवा, तुम्हाला नक्कीच यश मिळेल.

**मकर :** तुमच्या मनात नवीन कल्पना येतील आणि तुम्ही काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न कराल. नवीन काम सुरू करण्यासाठी तुम्हाला खूप उत्साह वाटेल.

**कुंभ :** आज तुम्ही नवीन मालमत्ता खरेदी कराल, ज्यामुळे भविष्यात तुम्हाला नक्कीच फायदा होईल. या राशीखाली जन्मलेल्या प्राध्यापकांना आजचा दिवस चांगला जाईल. मनासारखी संधी चालून येईल.

**मीन :** आजचा दिवस तुमच्यासाठी भावनिक असेल आणि तुम्ही तुमच्या कुटुंबासोबत वेळ घालवण्याच्या योजना आखाल, ज्यामुळे तुम्हाला आराम मिळेल. तुमच्या जवळच्या मित्रांच्या मदतीने तुम्ही तुमच्या सर्व समस्या सोडवू शकाल.

## शब्दकोडे क्रमांक २३१७




**आडवे शब्द :-**
१) गरम पाणी
४) कलमाच्या मधील गौण कलम
८) फूल, पुष्प
१०) मित्रा
१२) पर्जन्यकाळ
१३) बेचव
१४) रण.
१६) आभारासह
१७) बारीक दगड
१८) सोंगे वठविणारा
१९) फळावरील आवरण
२१) जन्म
२३) बारा वर्षाचा काळ
२५)किराणा व्यापारी
२६)भव्य, अवाढव्य
२८) कोलकाताचे जुने नाव
३०) शाळेत जाणारा
३२) गंध, मुक्काम
३३) कावळा
३४) वेदना
३६) उथळ वाटी
३७) साटेलोटे
३९) अभिप्राय
४०) नासलेला
४३) वेल
४४) नाश
४५) सततची एकसारखी हालचाल
४७) बशीचा जोडीदार
४९) यामिनी, रजनी
५०) सरड्याच्या वर्गातील घरात वावरणारा प्राणी
५१) वेळेचा कमीतकमी भाग
५२) अवधान
५३) गवंडी
५४) समुद्रकिनारा
५६) बसण्याची फळी
५७) दुसऱ्यावर चटकन विश्वास ठेवणारा, भोळा
५८) बिना वासाचे पांढरे फूल
५९) बडबड्या
६०) दावानल
६१)श्रीमंत, दैववान
६२) पंकज

**उभे शब्द :-**
१) गुण नसता ते असण्याचा आव आणणे
२) मजबूत, घट्ट व टिकाऊ
३) हात
४) भरीव नसलेले
५) अलमारी
६) बारीक केस
७) थोडक्यात महत्तम व लुघुत्तम साधारण विभाजक
९) कौरव-पांडवांची गाथा
११) वीररसातील गीत
१५) नमस्कार
१६) नदी नाल्यातून वाहत आलेला गाळसाळा
१७) कुटण्याचे जोडसाधन
२०) कागदावर रेघा ओढून भविष्य सांगण्याची विद्या
२१) मासे,पाणशेंगा
२२) यमराज्यात भोगाव्या लागणाऱ्या वेदना
२४) पलाश, एक त्रिदल
२७) विद्यालय
२८) कलावंताचा समूह
२९) हाताचा तळवा
३१) पद्धत
३२) रस्ता, मार्ग
३३) आजच्या आधीचा दिवस
३५) विविध
३६) प्रभात
३८) भुतांचा राजा
३९) मृत
४१) सूट
४२) व्यवहार, जाणे येणे
४४) निराश
४६) छाती
४८) सैन्याची तुकडी
५०) झाडाभोवतीचा कट्टा
५३) वहिवाट, येणाराजाणारांची गर्दी
५४) अर्णव
५५) टवाळी करणारा
५६) एक चतुर्थांश
५८) पोळ्या भाजण्याचे पसरट पात्र

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## भाजपवर टीका करण्याची आम्हाला गरज नाही

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ३ :



पुणे महापालिका निवडणुकीत एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने १२० उमेदवार मैदानात उतरवले आहेत. आमच्या मित्रपक्षाला वाटले होते की आम्ही ४० उमेदवारही उभे करू शकणार नाही, पण आम्ही काही तासांतच १२० जणांना ताकद दिली, अशा शब्दांत उदय सामंत यांनी भाजपचे नाव न घेता त्यांच्यावर निशाणा साधला. तर आम्हाला कोणावरही टीका करण्याची गरज नाही, कारण ते काम अजित पवार चोख पार पाडत आहेत, असा टोलाही सामंत यांनी लगावला.

शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे मंत्री उदय सामंत यांनी आज पुण्यात शिवसेनेच्या प्रचाराचा नारळ फोडला. यावेळी बोलताना त्यांनी भाजप आणि अजित पवार गटावर शालजोडीतले टोले लगावल, पुण्याचा पुढचा महापौर शिवसेनेच्या मदतीशिवाय होऊ शकणार नाही, असा ठाम विश्वास व्यक्त केला. इतिहासात पहिल्यांदाच शिवसेना पुण्यात इतक्या मोठ्या प्रमाणावर १२० जागांवर निवडणूक लढवत आहे.

उदय सामंत म्हणाले, आपला पक्ष पुण्याच्या विकासावर बोलणारा आहे, त्यामुळे आपण कोणावरही वैयक्तिक टीका करायची नाही. टीका करण्याचे काम आमचे मित्र अजित पवार पूर्ण करत आहेत, त्यामुळे विरोधकांच्या टीकेला आपण केवळ आपल्या विकासकामांनी उत्तर द्यायचे आहे.

उदय सामंत म्हणाले, १६ तारखेला जेव्हा निकाल लागेल, तेव्हा महापौर ठरवण्यासाठी शिवसेनेला विचारात घेतल्याशिवाय कोणालाही पर्याय उरणार नाही. आम्ही अनेक तरुण आणि नवे चेहरे दिले आहेत. पुणे ही कोणा एका पक्षाची मक्तेदारी नाही, हे पुणेकर या निवडणुकीत दाखवून देतील.

भाजप आणि शिवसेना ही नैसर्गिक युती आहे ही टिकली पाहिजे असे आमचे म्हणणे होते. पण काही लोकांचा गैरसमज होता की, आम्ही ४० देखील उमेदवार उभे करू शकणार नाही. आम्हाला वेळ कमी पडला, नाहीतर आपण १६५ उमेदवार उभे केले असते, असा टोला उदय सामंत यांनी भाजपला लगावला.

# वीज दरवाढीला तीव्र विरोध

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.३ :

देशातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात वीजदर सर्वाधिक आहे. तरीही महावितरणला नुकसान कसे होते, हे समजण्यास मार्ग नाही. त्यामुळे पुन्हा महावितरणचे वीजदर वाढवू नयेत, अशी ठाम मागणी ग्राहक संघटनेच्या प्रतिनिधी देवी बेताल यांनी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या (एमईआरसी) नागपुरातील जिल्हा नियोजन भवनात शनिवारी झालेल्या सुनावणीत केली.

या सुनावणीत ऑनलाईन पद्धतीने एमईआरसीचे अध्यक्ष संजय कुमार, सचिव डॉ. राजेंद्र जी. अंबेकर सहभागी झाले होते, तर नागपुरात प्रत्यक्ष डॉ. प्रफुल्ल वऱ्हाडे उपस्थित होते. महावितरणकडूनही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सुनावणीत हजेरी लावली.



देवी बेताल म्हणाले की, महावितरणकडून वीज देयकांमध्ये वेगवेगळ्या वीजवापराच्या नावाखाली ग्राहकांकडून अवाजवी दर आकारले जात असून, ग्राहकांची लूट केली जात आहे. राज्यातील अनेक भागांतील शेतकऱ्यांनी कृषी पंपासाठी मागणी शुल्क (डिमांड) भरूनही त्यांना अद्याप वीजजोडणी मिळालेली नाही. हे मुद्दे मांडले जात असताना आयोगाने बेताल यांना थांबवले.

आयोगाने स्पष्ट केले की, पुनर्विलोकन याचिकेत महावितरणने केलेल्या मागण्यांवरच चर्चा करण्याची विनंती करण्यात आली होती. मात्र, त्या मागण्या मला माहिती नाहीत, असे बेताल यांनी सांगितल्यानंतर त्यांना बोलणे थांबवण्यात आले.

अनंत सांघाय यांनी सांगितले की, महावितरणचे अस्तित्व टिकावे, ही सर्वांचीच इच्छा आहे. मात्र, त्यासाठी वीजदर वाढवणे हा उपाय नाही. महावितरणने एकीकडे आपले नुकसान कमी करणे आवश्यक असून, दुसरीकडे वीज खरेदी धोरणात बदल करून वीज खरेदी करारांमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. दिवसा सौर ऊर्जेमुळे वीज सर्वात स्वस्त उपलब्ध होत असल्याने, त्याचा लाभ उद्योगांसह इतर ग्राहकांनाही मिळायला हवा. त्यामुळे येथील उद्योग राज्याबाहेर जाणार नाहीत.

सनफ्लॅग कंपनीच्या प्रतिनिधींनी महावितरणच्या प्रस्तावाला कडाडून विरोध केला. महावितरणने सौर ऊर्जा साठवण्यासाठी बॅटरी स्टोरेज उभारण्याची गरज असल्याचेही स्पष्ट केले. त्यावर आयोगाने, तुमच्या कंपनीकडून लहान बॅटरी स्टोरेजसाठी काही प्रयत्न करण्यात आले आहेत का, असा प्रश्न उपस्थित केला.

यावेळी अनेकांनी कोणत्याही परिस्थितीत वीजदरवाढ नकोच, हा मुद्दा जोरकसपणे मांडला. त्यामुळे वीजदरवाढीला बहुतांश उपस्थितांचा कडाडून विरोध असल्याचे दिसून आले. यासंदर्भात नियामक आयोग काय निर्णय घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## नागपूरकर निलांबरी जगदळे पंजाबच्या पोलीस महानिरीक्षक

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. ३ :



पंजाब राज्यात लेडी सिंघम अशी ओळख निर्माण केलेल्या निलांबरी विजय जगदळे यांची पंजाब पोलीस दलात महानिरीक्षक म्हणून वर्णी लागली आहे. नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी त्यांनी या पदाचा कारभार हाती घेतला.

आपल्या धाडसी निर्णयांमुळे दरारा निर्माण करणाऱ्या निलांबरी जगदळे यांची नाळ मात्र राज्याची उपराजाधी असलेल्या नागपूरशी घट्ट विणली गेली आहे. गिरीपेठेत वाढलेल्या निलांबरी जगदळे यांचे संपूर्ण बालपण आणि शिक्षण हे नागुपरात झाले आहे.

रविनगरातल्या सीपी अँड बेरार शाळेच्या विद्यार्थीनी राहिलेल्या निलांबरी यांनी शिवाजी महाविद्यालयातून १२ आणि पुढे विश्वेश्वरय्या इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंगमधून एलेक्ट्रॉनिक विषयात अभियांत्रिकी पदवी शिक्षण पूर्ण केले आहे. निलांबरी यांनी इंदौर येथील बहुराष्ट्रीय कंपनीची नोकरी सोडून हैदराबादच्या पोलीस प्रशिक्षण केंद्रात प्रवेश मिळवला. तेथून भारतीय पोलीस दल सेवेत रुजू झालेल्या निलांबरी जगदळे यांनी २००८ या वर्षी पंजाब केडर निवडले. २००८मध्ये पंजाबच्या रुपनगर येथे सहाय्यक पोलीस अधिक्षक म्हणून रुजू झालेल्या निलांबरी यांनी नंतर लुधियाना, पठाणकोट, चंडीगडच्या पोलीस अधिक्षक पदाचा भार समर्थपणे पेलला.

२००४ पासून मोहालीसह, फरिदकोट गुप्तचर विभागाच्या उप महानिरीक्षक पदाचा भारही समर्थपणे आपल्या खांद्यावर सांभळला. नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी पंजाब पोलीस दलाच्या फरिदकोट परिक्षेत्राच्या पोलीस महानिरीक्षक पदावर वर्णी लागलेल्या निलांबरी यांच्याकडे गुप्तचर विभागाचाही अतिरिक्त पदभार आहे. पंजाब के-डर हे भारतातील अतिशय मोजक्या चांगल्या केडरमध्ये गणले जाते. समृद्ध असे हे राज्य सीमावर्ती प्रदेश असल्याने पोलिसांची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते. अशा राज्याच्या पोलीस दलात महानिरीक्षक या सर्वोच्चपदी त्यांची वर्णी लागली आहे.

निलांबरी यांचे वडील विजय जगदळे हे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेतून निवृत्त झाले. निलांबरी यांना आई शोभा आणि आजोबा मनोहर यांच्याकडून शिस्त वारसारुपात भेटली. पंजाब पोलीस दलात सेवा देत असताना त्यांनी आपला दरारा निर्माण केला आहे.

## पवारांचे दात तोंडात नाही तर पोटात..

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि.३ :

**लक्ष्मण हाके यांचा निशाणा**

ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी पुणे महापालिका निवडणुकीत गुंडांना तिकीट देण्याच्या मुद्यावरून सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली आहे.

फुले, शाहू व आंबेडकरांचे नाव घेणारे आज बोडके व आंदेकरांसारख्या गुंडांच्या कुटुंबीयांना तिकीट देतात, पवारांचे दात तोंडात नाहीत, तर पोटात आहेत, असेही ते म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेसने पुणे महापालिका निवडणुकीत कुख्यात गुंड गजा मारणे याची पत्नी जयश्री मारणे यांना उमेदवारी दिली आहे. त्यांनी पक्षाच्या एबी फॉर्मवर आपला उमेदवारी अर्ज भरला आहे. गजा मारणे सध्या तुरुंगात आहे. तो आपल्या काळ्या कारवायांप्रकरणी कुख्यात आहे. एवढेच नाही तर राष्ट्रवादी कुख्यात गुंड बापू नायर याच्या पत्नीलाही उमेदवारी दिली आहे. याशिवाय आयुष कोमकर हत्याकांडातील आरोपी कुख्यात गुंड बंडू आंदेकर याची भावजय लक्ष्मी आंदेकर व सून सोनाली आंदेकर यांनाही राष्ट्रवादीने उमेदवारी दिली आहे.

हाके म्हणाले, अजित पवार सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेपुढे नतमस्तक होतात. फुले, शाहू, आंबेडकरांचे नाव घेतात. पण गुंडांच्या कुटुंबीयांना तिकीट देतात. हीच त्यांची रणनीती आहे. गुंड, मवाली, पैसेवाले, मनी-मसल पॉवरवाल्यांनाच तिकीट दिले जात आहे.

## 'बिनविरोध'साठी मनसेच्या पदाधिकाऱ्याचा खून?

■ वृत्तसंस्था, सोलापूर, दि. ३ :

सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीत बिनविरोध निवडून येण्यासाठी मनसेच्या एका पदाधिकाऱ्याची हत्या करण्यात आल्याची घटना घडली आहे.

काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांनी या प्रकरणी भाजपला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. बिनविरोध निवडून येण्यासाठी मनसेच्या पदाधिकाऱ्याची हत्या करण्यात आली. पण आता ही हत्या कौटुंबिक वादातून झाल्याचा दावा केला जाईल, असे त्यांनी म्हटले आहे. बाळासाहेब सरवदे यांची बिनविरोध निवडणुकीसाठी हत्या करण्यात आल्याचा आरोप केला जात आहेत. भाजपने प्रथम बाळासाहेब सरवदे यांच्या चुलत भावाच्या पत्नीला उमेदवारी दिली होती. पण नंतर त्यांचा पत्ता कट करण्यात आला होता. त्यातून सरवदे यांची हत्या झाल्याचा आरोप केला जात आहे.

**प्रणिती शिंदे संतापल्या**



## आणखी एका स्वयंसेवकाचे बंड

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :

नागपूर महापालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारी वाटपावरून भारतीय जनता पक्षातील अंतर्गत असंतोष आता उघड बंडखोरीत रूपांतरित झाला आहे. काही ठिकाणी संघाशी संबंधित कार्यकर्ते थेट निवडणूक रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे भाजपची अडचण वाढली आहे.

महाल प्रभाग क्रमांक १८ मधून भाजपने बंडू राऊत यांना अधिकृत उमेदवारी दिली आहे. मात्र याच प्रभागातून संघाचे स्वयंसेवक धीरज चव्हाण यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याने पक्षासमोर पेच निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, सुरुवातीला भाजपकडून बंडू राऊत आणि धीरज चव्हाण या दोघांनाही एबी फॉर्म देण्यात आला होता. मात्र अंतिम टप्प्यात राऊत यांची उमेदवारी निश्चित झाल्यानंतर चव्हाण यांनी माघार घेण्यास स्पष्ट नकार दिला. परिणामी, महालमध्ये पारंपरिक तिरंगी लढतीऐवजी चौरंगी सामना रंगण्याची चिन्हे आहेत.

प्रभाग क्रमांक २२ हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय असलेला आणि भाजपसाठी परंपरेने सुरक्षित मानला जाणारा प्रभाग आहे. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्यासह संघाचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी येथील मतदार असल्याने या प्रभागाकडे राज्यभराचे लक्ष असते. मात्र यंदा याच संघभूमीतून पक्षीय राजकारणाविरोधातील सूर उमटत असल्याचे चित्र दिसत आहे.या प्रभागात संघाशी संबंधित निनाद दीक्षित आणि मुकुंद बापट हेही निवडणूक रिंगणात उतरले आहेत. निनाद दीक्षित कोणत्याही प्रमुख पक्षाचे अधिकृत उमेदवार नसून नागरिक समितीच्या माध्यमातून ते निवडणूक लढवत आहेत.

## आता कुत्र्यांचे सर्वेक्षणही शिक्षकांच्या माथी

### शिक्षण संचालनालयाचे आदेश : शिक्षक संघटनांचा तीव्र संताप

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. ३ :

शैक्षणिक संस्थांच्या परिसरात आढळणाऱ्या भटक्या कुत्र्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये नोडल अधिकारी म्हणून मुख्याध्यापक तर सर्वेक्षणासाठी शिक्षकांची नियुक्ती करण्याचे आदेश राज्यातील शिक्षण संचालनालयाने दिले आहेत. या निर्णयाबद्दल राज्यभरातील शिक्षक संघटनांसह पालकांनी नाराजी व्यक्त केली आहे.



सध्या शाळांत विविध स्पर्धा, घटक चाचणी, विज्ञान प्रदर्शन आणि इतर अभ्यासक्रमांची तयारी सुरू आहे. तसेच दहावी आणि बारावीच्या पूर्व परीक्षांची तयारी सुरु आहे. अशा वेळी शिक्षकांना अन्य कामांत गुंतवून ठेवल्यास अध्यापनावर परिणाम होईल, असा आक्षेप शिक्षकांकडून घेतला जात आहे.

आधीच शिक्षकांना भरपूर कामे शासनाने दिली आहेत. निवडणूक, आधार अपडेट, बँक डिटेल्स चेक करणे, विविध कागदपत्र करणे, बीएलओ आदी असंख्य कामे आहेत. यामुळे शिक्षणावर परिणाम झाला आहे. शिक्षण विभागाने अशा निर्णयाचा विचार करावा, अशी मागणी पुढे येत आहे.

या निर्णयाने अध्यापनावर थेट परिणाम होईल. वर्षाच्या शेवटी मूल्यमापन, स्नेहसंमेलने, स्पर्धा, निवडणुकीचे काम असते. त्यात आता ही जबाबदारी आल्याने शिकवायचे कधी? असा सवाल अनेक शिक्षकांनी उपस्थित केला आहे. दुसरीकडे, आदेशाचे पालन करावे लागेल, असे मत काही केंद्र प्रमुख व गटशिक्षणाधिकारी यांनी व्यक्त केले.

## इंदूर, मुंबईसाठी गोंदिया विमानतळावरून लवकरच उड्डाणे




■ महासागर प्रतिनिधी, गोंदिया, दि.३ :

स्टार एअर कंपनीने आता गोंदिया-इंदूर- मुंबई प्रवासी विमानसेवा पुढील १५ जानेवारी २०२६ पासून सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

बिरसी विमानतळावरून सध्या गोंदिया-हैद्राबाद-तिरुपती आणि गोंदिया-इंदूर-बंगळुरू या दोन मार्गावर स्टार एअर व इंडिगो विमान कंपनीने प्रवासी विमानसेवा सुरू केली आहे. आता गोंदियाहून इंदूरसह आता मुंबईला उड्डाण घेण्याचा प्रवाशांचा मार्ग मोकळा झाला आहे.

स्टार एयर लाईन्सने काही काळापूर्वी गोंदियातील बिरसी विमानतळा वरून इंदूर विमानतळासाठी सुरू केलेली उड्डाण सेवामध्ये काही तांत्रिक कारणांमुळे काही दिवस बंद केली होती. मात्र नववर्षात या विमान कंपनीने १५ जानेवारी पासून ही सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

चार पाच महिन्यापूर्वीच इंडिगो विमान कंपनीने गोंदिया-हैद्राबाद-तिरुपती या मार्गावर बिरसी विमानतळावरून प्रवासी विमानसेवेला प्रारंभ केला होता. या सेवेला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे या कंपनीने सुध्दा नवीन मुंबईत विमानतळ सुरू झाल्यानंतर गोंदिया-मुंबई-छत्रपती संभाजीनगर विमानतळावरून विमानसेवा या मार्गावर प्रवासी सुरू करण्याचा मानस व्यक्त केला होता. दरम्यान आता स्टार एअर कंपनीने १५ जानेवारी पासून मुंबई-इंदूर-गोंदिया व गोंदियाहून-इंदूर-मुंबईला जाणारी उड्डाणे आठवड्यातून सोमवार, मंगलवार, बुधवार, गुरुवार आणि शनिवार या ५ दिवस चालविण्याचा निर्णय घेतला आहे. गोंदियाहून थेट मुंबई विमानसेवा सुरू करण्याची मागणी गेल्या वषार्पासून केली जात होती.

## तिकीट नाकारल्याने कार्यकर्त्याचा पत्नीसह आत्महत्येचा इशारा



■ वृत्तसंस्था, नाशिक, दि. ३ :

नाशिक मध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत मोठी बंडाळी उफाळून आली आहे. उमेदवारी न मिळाल्याने संतप्त झालेल्या एका इच्छुक उमेदवाराने थेट पत्नीसह आत्महत्येचा इशारा दिल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

नाशिकमधील प्रभाग क्रमांक ३१ मधून उमेदवारीसाठी इच्छुक असलेले शिवा तेलंग यांनी सोशल मीडियावर एक पत्र पोस्ट करून खळबळ उडवून दिली आहे. शिवा तेलंग यांनी तिकीट वाटपावरून पत्नीसह आत्महत्येचा इशारा दिला असून, प्रमुख नेत्यांवरही गंभीर आरोप केलेत. दरम्यान, पत्रात आरोप केल्यापासून शिवा तेलंग हे पत्नीसह 'नॉट रिचेबल' असून, कार्यकर्त्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

## घरफोडी करणाऱ्यांची टोळी जेरबंद

■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. ३ :

बालकांचा खुबीने उपयोग करीत ठिकठिकाणी चोऱ्या करणाऱ्या टोळीस अटक करण्यात वर्धा पोलिसांना यश आले आहे. या टोळीने वर्धा जिल्ह्यात अनेक गावात तसेच नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यात काही ठिकाणी हात साफ केल्याचे उजेडात आले आहे. त्यांच्याकडून १० लाख रुपयावर मुद्देमाल पण जप्त करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली.

सावंगी मेघे परिसरातील रोहित विलासराव चंदनखेडे यांच्या घरातून चोरट्यांनी सोन्याचे दागिणे व रोख पळवून नेली होती. विशाल राम गायकवाड रा. कैकाडी नगर, नागपूर यानेच ही घरफोडी केल्याचे तपासात निष्पन्न झाले. पोलीस पथक नागपूर येथे पोहचले असता विशाल गायकवाड त्याचे साथीदार बर्डी मार्केटमध्ये फिरत असल्याचे समजले. त्याला व त्याच्या साथीदाराला दोन वाहनासह ताब्यात घेण्यात आले विशाल उर्फ बबलू राम गायकवाड, आदित्य राम गायकवाड यांच्यासह दोन विधी संघर्षित बालकांना ताब्यात घेतले असता त्यांनी घरफोडी केल्याची कबुली दिली. तसेच अन्य काही गावात घरफोडी केल्याचे मान्य केले. पोलीस स्टेशन देवळी, वर्धा शहर, सेवाग्राम, वरोरा, बुटीबोरी येथून माल लंपास केल्याचे स्पष्ट झाले.

आरोपीकडून ६ घरफोडीचे गुन्हे घडले आहेत. सदर आरोपींना न्यायालयाकडून तीन दिवस पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. संपूर्ण सहा गुन्ह्यात चोरीस गेलेले ६४ ग्रॅम सोन्याचे दागिने व रोख रक्कम, वाहने असा एकूण १०लाख ३८ हजार रुपयेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कार्यवाही पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा वर्धाचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, सपोनि पंकज वाघोडे, पीएसआय प्रकाश लसुंते व पथकाने केली.

